



भाग–१

# साहसी सत्य कथा





BVBK-0403024



3024

मानवी साहसांच्या रोमांचकारी विलक्षण सत्यकथा

# साहसी सत्यकथा

# १

(भाग १ व २ संच)

म. ग्रं.
3024 दिनांक
बा. क्र.
क्र.
विषय

लेखक
डॉ. प्र. न. जोशी

BVBK-0403024

श्रीराम बुक एजन्सी

■ प्रकाशक-मुद्रक
राम श्री. पासलकर
श्रीराम बुक एजन्सी
७२७ डी, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

■ सर्व हक्क सुरक्षित

■ मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०

■ प्रथमावृत्ती
१ जुलै १९९४

■ मुखपृष्ठ
जयंत ताडफळे

■ मूल्य
तीस रुपये
(भाग १ व २ संच : मूल्य साठ रुपये)

---

एकमेव विक्रेते : श्रीराम बुक एजन्सी, पुणे ३०
७२७ डी, सदाशिव पेठ, बॅरि. गाडगीळ स्ट्रीट, पुणे ४११ ०३०

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | चिंपाझी माझे मित्र | ५ |
| २. | एकटा मनुष्य चर्च बांधतो | २२ |
| ३. | अनामिकाचा भीषण अंत | ३४ |
| ४. | मी पत्नी कप्तानाची | ४६ |
| ५. | यात्रेकरू अग्निमुखात | ६१ |
| ६. | एका झेपेत न्यूयॉर्क ते पॅरिस | ७४ |

## माझे मनोगत

नव्याने वाचावयास शिकलेल्या व देशाच्या प्रगतीची काळजी करणाऱ्या नवयुवकांनी काय वाचावे, हा प्रश्न नेहेमीच महत्त्वाचा असला तरी दुर्लक्षित झालेला आहे. शिक्षणाने, साहित्याने चांगली सद्भिरुची जोपासावी असे वारंवार बोलले जात असले तरी त्या दृष्टीने प्रयत्न मात्र क्वचितच होत असताना दिसतात.

अशा पार्श्वभूमीवर मी काही वर्षांपूर्वीपासून अलौकिक व असामान्य स्त्री-पुरुषांच्या काही साहसकथा मराठी मासिकांतून लिहावयास सुरुवात केली. साहसाची, धैर्याची, पराक्रमाची नेहेमीच हौस तरुण मनास वाटावयास हवी. हे साहस, है धैर्य, हा पराक्रम केवळ रणांगणावरच असतो असे नाही. हातात केवळ खड्ग अथवा पिस्तूल घेऊनच शौर्य गाजविता येते असे नाही. निसर्गाचे प्रतिकूल आव्हान स्वीकारण्यात जे धैर्य प्रकट होते ते काय कमी प्रतीचे मानावे? अज्ञाताचा शोध घ्यावा, ज्या वाटेने पूर्वी कुणी गेलेच नाही अशा नव्याच वाटेचा प्रवास करावा, त्यातील संकटांना हसतमुखाने तोंड द्यावे, इष्टमित्रांचा व आप्तेष्टांचा नाद सोडावा आणि ऐन वयात अज्ञाताकडे झेप घ्यावी व उभे आयुष्य या एका कैफाने भारावून जावे; अशा अनुभवांतील धैर्य अवर्णनीय तर खरेच. देवासाठी जिवलगांचा, स्वतःच्या प्राणाचाही त्याग करावा ही शिकवण जुनीच आहे. तिचे नवे रूप असे की, देव या विविध रूपांनी नटलेल्या सृष्टीत व भल्याबुऱ्या अनुभवांतून नटलेला आहे. त्याचाही शोध घेणे आवश्यक आहे.

ऐन वयात लौकिक मार्ग सोडून कुणी सागराच्या तळाशी बुडी घेतो, कुणी पर्वतशिखरावर सर्वांत उंच ठिकाणी पाय ठेवितो, कुणी अज्ञात नदीचा उगम शोधतो, कुणी रखरखते वाळवंट पायी तुडवितो, कुणी घनदाट जंगलाचा आश्रय घेतो, कुणी अंतराळातून वेगाने चक्कर मारून उच्चांक प्रस्थापित करतो, कुणी सतत पोहण्याचा विक्रम करतो, कुणी जंगली श्वापदांच्या सहवासात वर्षानुवर्षे काढतो. कुणी ज्वालामुखीच्या जबड्यात उडी घेऊन पृथ्वीचे अंतरंग तपासतो; अशी अनेक साहसे या पुस्तकमालेत सचित्र करून सांगण्याचा प्रयत्न मी करीत आहे. यातील बहुतेक सर्व साहसकथा सत्य घटनांवर आधारलेल्या आहेत. इंग्लिश भाषेतील साहसकथांचे संग्रह, नॅशनल जिऑग्राफिक मॅगॅझिन, रीडर्स डायजेस्ट इत्यादींचा आधार मी घेतलेला आहे, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावयास हवे. तरी प्रत्येक साहसकथेची रचना स्वतंत्र व वेगळ्या घाटाची आहे.

पुस्तकाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन ॐकार प्रकाशनचे श्री. राम पारलकर, यांनी मोठ्या हौसेने केले आहे. ते त्यांच्या लौकिकास शोभणारे आहे. माझ्या व त्यांच्या या उपक्रमाने मराठी वाचकांना आनंद झाला तर आम्हा दोघांनाही उत्साह वाटेल.

– प्र. न. जोशी

३, सामदा डॉ. केतकर पथ,
९८/१, प्रभात रस्ता, पुणे ४११ ००४.

3028 9/12/54
बा.वा.

# १ : चिंपांझी माझे मित्र

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

जेन गुडऑल ही सर्वसामान्य तरुण मुलीपेक्षा फारच निराळी आहे असे म्हणायला हवे. कारण, नव्यानेच यौवनात पदार्पण करणाऱ्या तरुणीला ज्या तऱ्हेचा आयुष्यक्रम हवासा वाटेल, त्याच्या अगदी विरुद्ध असे कार्यक्षेत्र आणि जीवनध्येय तिने स्वखुषीने निवडले आहे ! ही देखणी तरुणी आपले घरदार आणि आपली माणसे सोडून आफ्रिकेच्या जंगलात चिंपांझी माकडांच्या संगतीत राहायला गेली आहे. आणि सहाजिकच तिथल्या वास्तव्याला आवश्यक असा वेष, असाच आहार आणि अशीच राहणी तिने पत्करली आहे.

जेन गुडऑल ही मूळची लंडनची. केंब्रिज विद्यापीठात 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी'चा अभ्यास करणारी ही विद्यार्थिनी; पण नैरोबीमधील कॉरिंडन वस्तुसंग्रहालयाचे प्रमुख डॉ. लुई लीकी यांची तिने भेट घेतली आणि चिपांझींचा अभ्यास करण्याचा आपला मनोदय तिने त्यांना सांगितला. त्यांनी मदत करण्याचे आश्वासन देताच तिला फार आनंद झाला. तिने टांगानिकाच्या जंगलात जाण्याचा आपला विचार कायम केला. तिथे कॉरिंडन वस्तुसंग्रहालयाचे प्रमुख डॉय लीकी यांची भेट घेतली. आपला मनोदय तिने त्यांच्याजवळ प्रकट केला. डॉय लींकी यांनी तिला चिंपांझी माकडांच्या अभ्यासासाठी मदत करण्याचे ठरविले. जेनला केवढा आनंद झाला !

घरून निघताना अगोदर जेनला कुणी या विचित्र साहसांस परवानगी देईनात ! एकट्या-दुकट्या मुलीने कुठे जंगलात जायचे आणि इतक्या दूर ? काहींनी चिंपांझी माकडे अरण्यात पाहिली होती. त्यांनी जेनला बजावले,

"चिंपांझींच्या आसपास तर तुला कधीच फिरकता येणार नाही, दूर झाडाआड दडूनच राहावे लागेल." तिलाही फारशी माहिती नव्हती. तिने प्राणिसंग्रहालयातील चिंपांझी पाहिला होता; पण तिच्या मते तो खरा चिंपांझी नव्हताच ! बरेच दिवस पकडून ठेवलेले चिंपांझी, पिंजऱ्यातील पोपट, गारुड्याच्या टोपलीतील नाग हे काही ते ते खरे प्राणी नव्हेत. त्यांचे खरे वैभव त्यांच्या त्यांच्या खास नैसर्गिक अशा परिस्थितीतच पाहावयास हवे. यासाठी ती उत्सुक होती. डॉ. हेन्री निसन यांनी चिंपांझी माकडासंबंधी काही संशोधन करून सन १९३१ साली एक अहवालही तयार केला होता, तो तिच्याजवळ होताच.

त्याच्या आधारे तिला चिंपांझी माकडांचा अधिक अभ्यास करायचा होता. आफ्रिकेत नव-जागृती होत आहे; शिक्षणाचा प्रसार होईल; कारखाने, उद्योगधंदे वाढतील आणि आधीच संकटात असलेले हे वन्य पशू आणखी दुर्मिळ होत जातील ! त्या आधी तिला हा अभ्यास हाती घ्यायचा होता. ह्या माकडांच्या अभ्यासावरून तिला माणसाच्या वर्तनाकडे वळायचे होते. चिंपांझींचे समाजजीवन, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे विकार-प्रदर्शन, त्यांच्या सवयी, त्यांचे एकूण वर्तन ह्यांविषयी तिला भारी कुतूहल होते. ह्या माकडांना अक्कल कितपत असते– हाही एक प्रश्न तिच्यासमोर होताच.

वुल्फगँग कोहलर याने माकडांच्या बुद्धिमत्तेविषयी काही संशोधन ह्यापूर्वी केलेले होते. खोलीत ठेवलेली वा टांगलेली केळी माकडे कशी खातात, जवळची काठी कशी वापरतात, स्टूल कसे घेतात, त्यावर कसे चढतात, दोन लहान काठ्या एकमेकांना बांधून काठी लांब करण्याचा प्रयत्न कसा करतात; ह्याविषयी मनोरंजक प्रयोग 'सुलतान' नावाच्या माकडावर कोहलर याने केले होते. परंतु खास जंगलात जाऊन, तिथे राहून, चिंपांझींच्या वस्तीत जाऊन, त्यांच्यांत मिसळून अभ्यास करणारी ही जेन गुडऑल, एका नव्याच साहसास प्रवृत्त झाली होती !

डॉ. लीकी आपणास ह्या कामी मदत करणार आहेत, असे समजताच जेन गुडऑल हिला फार आनंद झाला. अनेक खटपटी करून तिने अमेरिकेतील इलिनॉइस स्टेटमधील विल्की फाउंडेशनकडून काही प्राथमिक मदत मिळविली. पण एक अडचण निर्माण झाली ! आफ्रिकेच्या जंगलात जाऊन राहाण्यास या

एकट्या मुलीस अधिकारी परवानगी देईनात. कुणीतरी बरोबर असावे असा त्यांचा आग्रह सुरू झाला. गुडऑलच्या आईने मुलीची ही अडचण भागवली. ती स्वत:च तिच्याबरोबर आफ्रिकेत जाण्यास सिद्ध झाली. नैरोबीहून मायलेकी पाच दिवसांचा खडतर प्रवास करून टांगानिका सरोवराच्या राखीव जंगलात येऊन पोचल्या. किगोमा नावाच्या एका लहानशा युरोपीय वसाहतीत त्यांनी आपला मुक्काम ठेवला. तिथून सोळा मैलांवर चिंपांझी माकडांच्या वस्तीचे जंगल होते. लाँचमधून सरोवरातून तिथपर्यंत तिला रोज जावे लागत होते. तिच्याबरोबर इथला नित्याचा माहीतगार डेव्हिड ॲन्स्टी हा होता.

टांगानिका सरोवरातून प्रथमच प्रवास करताना जेनला फार हुषारी वाटली. ज्या जंगलांत, ज्या दऱ्याखोऱ्यांत आपणास दिवस काढायचेत, तो भाग तिने नीट पाहून घेतला; समजावून घेतला. डोंगरांचे सुळके सरळ वर आकाशाशी भिडले होते ! जंगलांचा भाग दाट होता. अनेक ओढे, नाले सरोवरास येऊन मिळत होते. याच भागाच चिंपांझींची वस्ती होती. बरोबरच्या ॲन्स्टीने तिला चिंपांझींच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यातल्या काही भयानकही होत्या. एका चिंपांझीची कथा तर तिच्या विशेष लक्षात राहिली.

एका ताडाच्या झाडावर एक आफ्रिकन मनुष्य तेलासाठी तिथली फळे काढायला चढला. त्याच्या आधीच वर शेंड्यावर जाऊन एक भलामोठा चिंपांझी फळे तोडून खात होता. आपल्या मागून एक मनुष्य झाडावर चढून येत आहेसे पाहून चिंपांझी सरळ खाली उतरू लागला व त्याने त्या माणसास एक जोराचा धक्का दिला, त्याचा गाल रक्तबंबाळ केला, त्याचा डोळा त्याने फोडून टाकला व तो भर्रदिशी निघून गेला. चिंपांझी माकडाचे हे भीषण वर्तन जेन गुडऑल जीव मुठीत धरून ऐकत होती.

दुपारी दोनच्या सुमारास ती डेव्हिडबरोबर दहा मैल आत, टांगानिका सरोवराच्या काठी गेली. मग काठावरच्या जंगलात दोघेही उतरली. या पहिल्याच दिवशी कडक उन्हाने तिचा जीव कासावीस होऊन गेला. डेव्हिड ॲन्स्टीने तिला सर्व प्रकारच्या सूचना दिल्या. चिंपांझींची प्रतीक्षा ती रोज करू लागली. रोज तिच्याबरोबर कोण योणार ? तिची आई वस्तीतच राहून भोवतालच्या आफ्रिकन लोकांना औषधपाणी देऊ लागली. डोमिनक हा एक आफ्रिकन मनुष्य

व त्याची बायको किरकोळ कामात मदत करण्यास तयार होती. जेन गुडऑल भल्या पहाटेच तयार होऊन चिंपांझींच्या वस्तीकडे येण्यास निघे. प्रथमप्रथम तिची निराशा झाली. तासन् तास उन्हात रखडावे, हिंडावे, पण चिंपांझीचे दर्शन होऊ नये ! – असेच पहिले काही दिवस गेले. तिने अनेक ओढे, नद्या, नाले, डोंगर ओलांडले; अनेक जंगले निरखून पाहिली. कधी तिला झाडावर चिंपांझी दिसत; पण तिची चाहूल लागताच ते निघून जात. चिंपांझी तिच्यासमोर एक क्षणभरही थांबत नसत. मग त्यांचा अभ्यास कसा करायचा ?

शिवाय, या जंगलातील वास्तव्यात काही अपेक्षित व काही अनपेक्षित अशा अडचणी खूपच निर्माण होत. जंगलातील उष्णतेच्या प्रखर लहरी जीव नकोसा करून सोडीत. एक लहानगा तंबू नीटपणे उभा राहिला, तेव्हा थोडीफार सोय झाली. तिचे सामानसुमानही फारसे नव्हते. एक लहानसे टेबल, एकदोन घडीच्या खुर्च्या व थोडे कपडे, दोन कपबश्या, छोटी किटली, खाद्यपदार्थांची काही खोकी, थर्मास, टिनच्या दोनतीन थाळ्या यांखेरीज तिच्याबरोबर सामानांची कटकट फारशी नव्हती. तिच्या आईजवळ औषधांच्या बाटल्या त्यांना व इतरांना उपयोगी होतील म्हणून होत्या.

जंगालांतून हिंडतानाही तिचा पोषाख सुटसुटीत व चपळाईस योग्य असा होता. प्रारंभीच्या काळात तिला मोठे खडतर व कष्टाचे दिवस काढावे लागले, तरी याच मार्गाने ती जंगलाच्या वातावरणाशी परिचित होत राहिली. कधी चिंपांझीची खसखस झाडीत ऐकली की ती चपापत असे; आणि या नवख्या स्त्रीस पाहून चिंपांझीही भीत असत. डोंगराच्या वाटाही तिला फारशा परिचयाच्या नव्हत्या. इतर जनावरे व माकडे यांच्या वर्दळीमुळे काही पुसट वाटा तिला दिसत. त्या किती सुरक्षित याचाही अंदाज तिला नव्हता. इतर लहानसहान प्राणी व माकडे यांचा परिचय दुरून का होईना, पण तिला होत राहिला. वानरे व रानडुकरे यांचा उपद्रव किती होईल याविषयी ती साशंक होती.

जंगलातून एकदा ती एकटीच चालली असताना मासे धरणारा एक आफ्रिकन मनुष्य भीतभीतच तिच्या समोर आला. त्याने घाबरलेल्या अवस्थेत तिला एक बातमी दिली. सरोवराकाठी असणाऱ्या एका झाडाशी एक मस्तवाल रानरेडा बेफाम झाला आहे. गेल्या रात्री त्याने आपला पाठलाग करून कोणता

भयानक प्रसंग आणला याबद्दल त्याने तिला – तिने सावध असावे म्हणून – सूचना दिली. या माणसाने आपल्याच भाषेत तिला म्हटले, 'हुयु काली सॅना', 'फार भयंकर आहे जनावर ते !' असा त्याचा अर्थ होता. जेन गुडऑल या वृत्तांताने थोडी अस्वस्थच झाली. तरी धीर धरून ती पुढे गेली. तिने ते झाड पाहिले. रानरेड्याने अनेक टकरा देऊन झाडाच्या खोडास जबर दुखापत केल्याचे तिच्या ध्यानात आले.

अशा प्रसंगात आपण काय करावे असाही विचार तिच्या मनात चमकून गेला; आणि असा प्रसंग एकदा तिच्यावर पुढे आलाही.

एका अरुंद वाटेने ती एकटीच जात असताना समोरून मस्त झालेले व दबा धरून बसलेले दोन रानरेडे तिच्याच रोखाने येत असलेले तिला दिसले. तिने चपळाई करून झाडावर चढण्यास सुरुवात केली. ती बरीचशी वर झराझरा गेली. कितीही धीट असली तरी या प्रसंगी तिची छाती धडधडत होती. पण संकट फारसे जाणवले नाही. दोनचार धडका झाडाच्या बुंध्याला देऊन रानरेडे निघून गेले. तरी जेन गुडऑलच्या मनात इतर कोणत्याही श्वापदापेक्षा या रानरेड्यांची भीती शेवटपर्यंत थोडीफार तरी होतीच ! या निर्बुद्ध व भयानक प्राण्याबद्दल डॉ. लीकी यांनीही तिला काही हकीकती सांगितल्या होत्या.

अशा या जंगलात ही तीस वर्षांची तरुणी दिवसदिवस हिंडायची. तिच्या चेहेऱ्यावर एक प्रकारची निर्भयता दिसायची. तिचा पोषाख खास प्रवासी असे. अर्धी खाकी चड्डी, तसाच खाकी शर्ट, पाठीवर प्रवासी बॅग, मानेवर सोनेरी केसांची साधीशी गाठ. खांद्यावर दुर्बीण लोंबती सोडली आहे, पायात कॅनव्हासचे बूट आहेत; ती चपळाईने डोंगरदऱ्या चढते-उतरते आहे. झुळझुळत शेजारून वाहणाऱ्या ओढ्यांमुळे उन्हाची तलखी जरा कमी जाणवते आहे.

काही दिवस असेच गेले. जंगलाची तर पूर्ण महिती झाली ! 'हाही लाभ थोडा नव्हे !' अशी समजूत तिने करून घेतली. अनेक प्राण्यांच्या खुणा तिला तिथे दिसत होत्या. इथल्या रानात भयंकर रानरेडे, चित्ते, सिंह, गेंडेही कधीकधी दिसतात, अशीही माहिती तिला डॉ. लीकी यांनी दिली होती. कधीकधी तिला या हिंस्र श्वापदांची पावले उमटलेली दिसत. कधी त्यांचा अगदी दूर असा आवाज येई; पण जात्याच जेन गुडऑल धीट होती. रानरेड्याखेरीज कुठल्याही

प्राण्याला न भिता, न दडता वागले तर आपण सुरक्षित असतो हे तिने जाणले होते. याचा परिणाम असा झाली की, थोड्याच दिवसात रोज येणाऱ्या या मुलीची ओळख तिथल्या प्राण्यांना नीट पटली. पाचशे यार्डांवरून पळून जाणारे चिंपांझी आता, पाच-सहा महिन्यांत शंभर फुटांवरून वावरू लागले. झाडाच्या बुंध्याशी बसून ती जंगलाचे निरीक्षण तासन् तास करीत असे. डोंगराच्या माथ्यावरून चिंपांझींचा गट खाली उतरत असताना तिला दिसे. ती त्यांच्याजवळ जाण्याचा प्रयत्न न भिता करी. त्यांच्या हालचालींचे शांत चित्ताने निरीक्षण करी. प्रमुख चिंपांझी तिच्या आता ओळखीचे झाले होते, आणि चिंपांझींनाही ही आता परकी वाटत नव्हती. प्रत्येकाची विशिष्ट सवय पाहून, चेहेरेपट्टी निरखून, मिश्किलपणा पाहून तिने त्यांना आपल्या परिचित लोकांची नावे दिली होती. माइक, काऊंट ड्रॅकुला, मिसेस मॅग्ज, स्रे, मि. मॅक्ग्रोगर इत्यादी चिंपांझी मंडळी आता तिच्या परिवारातीलच जणू बनली !

पहिल्या तीन महिन्यांचे जेन गुडऑलचे काम पाहून वॉशिंग्टनच्या प्रसिद्ध नॅशनल जिऑग्राफिक सोसायटीने तिला आणखी मदत वाढवून दिली. याच संस्थेच्या मासिकाला तिने 'माय लाइफ अमंग वाइल्ड चिंपांझीज्' नावाचा एक विस्तृत लेख या आपल्या अनुभवासंबंधी लिहिला आहे. जंगलाचा सर्व भाग तिच्या परिचयाचा झाल्यानंतर व तिच्या कामांचे स्वरूप पाहिल्यावर, तिला एकटीला राहण्यास अधिकाऱ्यांनी परवानगी दिली. तिची आई इंग्लंडमध्ये परत गेली. डॉ. लीकीबरोबर पंधरा वर्षे काम करणाऱ्या हसन नावाच्या एका आफ्रिकन मनुष्याची तिला यानंतर मदत मिळाली.

जेन गुडऑलच्या चिंपांझींच्या निरीक्षणास आता शास्त्रीय रूप येत राहिले. आपल्या भागात यांची भटकंती सारखी चाललेली असते. एके ठिकाणी घर करून राहणे चिंपांझीना माहीत नाही. झाडांच्या आश्रयाने काही चिंपांझी झोपतात; पण ही झाडेही प्रत्येकाची ठराविक असतात असे नाही. या राखीव जंगलात साठ-सत्तर तरी लहानमोठे चिंपांझी असावेत. फुले, फळे, इतर भक्ष्य प्राणी यांच्या सुलभतेच्या मानाने चिंपांझींची चाल रोज आठ-दहा मैलांची होत असे. चारचार, पाचपाच चिंपाझींचा एकेक गट असतो. यात नर, मादी, लहान चिंपांझी यांची सरमिसळ असते. कधी दोनतीन गट मिळून-मिसळून वावरत असतात.

पण हे सातत्य टिकून राहत नाही. आपला गट सोडून दुसऱ्या गटात जाण्याची प्रवृत्ती नरात अधिक प्रमाणात असल्याचे तिला आढळून आले ! त्यांच्या या भ्रमंतीमुळे कधी त्यांची ओळख पटणे कठिण होऊन बसे.

रात्र झाली की चिंपांझी माकडे झोपण्यासाठी आपला बिछाना कसा करतात हे जेन गुडऑलने बारकाईने पाहिले आहे. त्यांचे एक लहानसे घरटे झाडांच्या फांद्यांवर असते. झाडांच्या अनेक फांद्यांची टोके एकत्र करून त्यांचे घरटे बनते. मग मऊमऊ पानांचा थर त्यावर अंथरला की त्याचा बिछाना तयार होतो.



त्यावर तो विसावतो; पण पुरेसा मऊ बिछाना नाही हे त्याच्या ध्यानात येताच त्रासिक मुद्रेने तो लगेच उठतो. पुन्हा काही पाने तोडतो, बिछान्यावर घालतो व मग सुखाने झोपण्याच्या तयारीस लागतो. एकदा तर ज्या झाडाखाली गुडऑल निरीक्षण करण्यास बसली होती, त्याच झाडावर पाच चिंपांझींचा एक गट होता. तिच्या दृष्टीने त्यात मिसेस मॅग्ज व तिची दोन मुले होती. 'स्प्रे' हा पाच वर्षांचा असावा. 'जो' केवळ दोन वर्षांचा होता. त्यांच्याबरोबर एक नर-ह्यूग व एक मादी-मॅटिल्डा असे एक जोडपे होते.

याच गटात सूर्यास्ताच्या वेळेस आणखी एक नर येऊन मिळाला. स्प्रेने खाली उतरून या नवागताचे स्वागत केले. हा

नवागत गुडऑलच्या मते 'मिस्टर मॅक्‌ग्रोगर' होता. हा म्हातारा झाला असून त्याच्या खांद्यावरचे केस गळून गेले होते. त्याच्या डोक्यालाही टक्कल पडत चालले होते. सरोवराच्या पलीकडे असणाऱ्या डोंगरामागे सूर्य पूर्णपणे मावळला. मग मिसेस मॅग्जने आपल्या बिछान्यासाठी जागा निश्चित केली. बाकीच्यांनीही आपापली घरटी तयार केली. अंधार पडल्यावर मिसेस मॅग्ज घरट्याला पाठ लावून पडून राहिली. मग रात्री कमालीची थंडी पडली ! जवळच असलेला लहानगा 'जो' आईच्या कुशीत शिरण्यासाठी तिच्या जवळ आला. पोराची व्यथा आईस समजली. हातं लांबवून, तिने त्याला जवळ ओढून आपल्या अंगाच्या उबेत झोपविले.

चिंपांझींचा हा सर्व व्यापार चांदण्या रात्री जेन गुडऑल पाहात होती. तिला कसलेही भय नव्हते; भुकेची शुद्ध नव्हती. बरोबर असलेले अन्न तिने थोडेफार खाल्ले व पुन्हा चांदण्यांत न्हाऊन निघालेल्या जंगलाची शोभा पाहण्यास तिने सुरुवात केली. मधे जेनने थोडी विश्रांती घेतली व सारी रात्र त्याच जंगलात काढली. सकाळी तिने झाडाकडे पाहिले. 'जो' अजूनही आईच्या कुशीत होता. थोड्या वेळात तो जागा झाला. हातपाय ताणून त्याने एक दीर्घ जांभई दिली व इकडेतिकडे भटकण्यास सुरुवात केली. पोराच्या या कटकटीमुळे मिसेस



मॅग्जही जागी झाली. आपली पाठ तिने बिंछान्यावर एकदा घुसळून पाहिली. तिनेही हातपाय लांबवून आळोखेपिळोखे दिले. 'जो'ने आपली आई जागी झाल्याचे पाहिले. तो चटकन तिला बिलगला, तिच्या गालाला आपला गाल त्याने लावला. आपले हात तिच्या गळ्यात टाकले. इतर चिंपांझीही उठून कामाला लागले. मिसेस मॅग्ज आपल्या छोट्या 'जो'ला कशी खेळवीत आहे, शिकवीत आहे, हेही जेन गुडऑलने पाहिले. मॅग्जच्या पोटाशी राहूनच जो कित्येकदा वावरत असे. माणसाच्या मुलाप्रमाणेच चिंपांझीची पिले पहिले कित्येक दिवस आईवर अवलंबून राहत असतात. मग त्यांच्या हातापायांत शक्ती येते. पहिले चार महिने ती आईला कधीच सोडत नाहीत. मग काही फूट, काही यार्ड दूर जाण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. एक वर्षात त्यांना चांगला आत्मविश्वास येतो. मग तासन् तास ते एकटेसुद्धा खेळतात. त्यांच्या वयाच्या चिंपांझीबरोबर ते खेळतात, फांदीच्या एका टोकास एक व दुसऱ्या टोकास दुसरा असे राहून त्यांची रस्सीखेच सुरू असते. दोन वर्षात त्यांची चपळाई नजरेत भरण्याजोगी वाढते. अनेक चेष्टा ते एकमेकात करीत असतात.

तीन वर्षानंतर मग मात्र चिंपांझी बरेच स्वतंत्र राहातात. पाच सहा वर्षाचे झाले की मग आईची मदत त्यांना बहुदा लागत नाही. तिच्या अंगाशी खेळणे, तिच्या जवळ झोपणे हे त्यांना आवडत नाही. आठ वर्षांचा चिंपांझी चांगला वयात आलेला असतो. दोन-तीन वर्षात तो चांगला प्रौढ दिसतो. त्याचे आयुष्य बहुदा चाळीस ते पन्नास वर्षाचे असावे, असे जेन गुडऑलचे अनुमान आहे.

चिंपांझी पुष्कळ वेळा एकमेकांशी सलोख्याने वागतात, त्यांचे चीत्कार व त्यांचे गोंगाट आपणास पुष्कळ वेळा भांडणासारखे वाटतात — विशेषत: ते मोठ्याने आवाज तोंडाने करतात, कधी झाडांच्या खोडांचा करतात, कधी फांद्या जोराने हलवून करतात. मादी चिंपांझी व लहान पिले तोंडाने चीत्कार करतात. पण हे त्यांचे भांडण नसते. त्यांच्या आनंद-प्रदर्शनाची ही एक तऱ्हा असते. त्यांच्यातील कलह फार सौम्य प्रकारचा असतो. मादीवरून भांडणे बहुदा होत नाहीत. एकाच मादीबरोबर कुठलाही द्वेष मनात न बाळगता सात चिंपांझी वावरू शकत असल्याचे गुडऑलने पाहिले आहे. त्यांच्या समागमाचे विशिष्ट महिने वा दिवस असतात असे नाही. पण एप्रिल, जून, सप्टेंबर व ऑक्टोबर

या महिन्यांत पिलांची संख्या विशेष असते. एकमेकांस कुरवाळणे, गोंजारणे, केसांतील गदळ काढणे या क्रिया तर सतत चालू असतात. यातूनच त्यांची प्रणयभावना प्रकट होत असावी.

'चिंपांझींची भाषा असू शकते का?' जेन गुडऑलने याही प्रश्नाचा थोडा विचार केलेला आहे. माणसांच्या भाषेशी तुलना होईल अशी भाषा अर्थातच त्यांना नसते. पण ध्वनींना, कृतींना, चीत्कारांना काही संकेत जोडून, त्यांना मनोगत व्यक्त करता येतात. स्वागत करायचे झाल्यास सौम्यपणे ते 'हूऽ' असा आवाज करतील. कधी त्यांचे डरकाळणे चालते, कधी त्यांचे मोठ्याने ओरडणेही चालू असते. कधी ते रागावले की 'व्रँऽ व्रँऽ' करून आवाज काढतात. आपल्या आगमनाची वर्दी ते विशिष्ट आवाज करून देतात. ह्या सर्व ध्वनींचे अर्थ इतर चिंपांझींना समजतात; त्या अर्थाने ही त्यांची भाषाच झाली. स्पर्शाने, मुद्रा-अभिनयाने चिंपांझी पुष्कळ वेळा आपले मनोगत व्यक्त करतात.

कुठे दूर जाताना वा झाडावरून उतरताना आई आपल्या मुलास गोंजारते, त्याच्या पाटीवर थाप देते. कधी काही प्रिय वस्तू हवी असेल तर चिंपांझी आपल्याप्रमाणेच हात पुढे करतात. कुरवाळणे, खाजविणे हे एक भावनाप्रदर्शनाचे साधन आहे. चिंपांझी एकमेकांचे अंग कुरवाळतात. मधेच दुसऱ्याची पाळी आली की तो पहिल्याला खो देऊन उठवितो व स्वतःस त्याने कुरवाळावे म्हणून इच्छा प्रकट करतो.

एकदा तीन नर एकमेकांचे अंग कुरवाळीत होते, गोंजारीत होते. मादीस तशीच इच्छा झाली. तिने प्रत्येकास एकएक धक्का दिला. पण कुणीच तिच्याकडे लक्ष दिले नाही. मग ती दुःखी झाली व तशीच कष्टी होऊन दूर जाऊन बसली व स्वतःचे अंग स्वतःच गोंजारीत बसली.

फार दिवसांनी दोघे मित्र भेटले की ते एकमेकांच्या गळ्यात हात घालून भेटतात.


जेन गुडऑलने चिंपांझींचे त्यांच्याच वस्तीत जाऊन असे निरीक्षण पुष्कळ दिवस केले. चिंपांझींना आता तिची भीती वाटत नव्हती. मोकळ्या मनाने ते तिच्याभोवती वावरत. काहींनी तिला आपल्यातलीच मानले. तिच्याजवळ येऊन काहीजण बसू लागले. पाच-दहा फुटांच्या अंतरावर वावरण्यात आता त्यांना

भीती नव्हती. जेनची भीडही कमी झाली होती. ती स्वस्थ बसून राही. माणसाने हालचाल केली, धावपळ केली, आरडाओरडा केली की त्यांना भीती वाटते; मग प्रतिकारासाठी तेही अंगावर धावून येतात. जखमही कधीकधी करतात, हे गुडऑलला माहीत असल्याने तो सावधगिरी घेई. त्यामुळे चिंपांझींचा राग तिच्यावर कधीच नव्हता.

एक चांगला प्रौढ असलेला चिंपांझी तर तिचा मित्र बनला होता. तिच्या तंबूभोवतीच्या ऑइल-पामची फळे परिपक्व होत असताना डेव्हिड ग्रेबीअर्ड प्रथमच ओळख ठेवून तिच्या आवारात आला.' तो पुनः पुन्हा येत राहिला. झाडावरची फळे त्याने एक आठवडाभर खाल्ली; मग तो येईनासा झाला. पुन्हा फळे पिकायला लागली की ग्रेबीअर्ड दाराशी उभा असे. खाली जेन वावरत असताना तो झाडांवर चढून स्वस्थपणाने फळे खात असे. त्याला आता संकोच वाटत नव्हता. चिंपांझींना केळी आवडतात हे तिला माहीत होते. ती त्याला केळी देऊ लागली. तेव्हा तर तो चांगलाच माणसाळू लागला. शेवटी तर तो तिच्या भोवतीभोवती असे. तिच्याकडून त्याला भरपूर केळी मिळत असत. काही दिवसांच्या सरावाने ग्रेबीअर्डने तर तिच्या हातातून केळे घेतले. त्याला व तिला कुणालाच भीती नव्हती ! मैत्रीची, स्नेहाची भावना दोघांच्यात होती. तिला हा क्षण मोठा गमतीचा वा उत्साहाचा वाटला. तिच्या हातातील केळी पाहताच त्याला पराकाष्ठेचा आनंद झालेला दिसला. तो उठून ताठ उभा राहिला; आणि मागील दोन पायांवर माणसासारखा चालतच तिच्या जवळ आला. सौम्यपणे त्याने तिच्या हातून केळी घेतली. ओरबाडणे, हिसकावून घेणे, पळून जाणे वगैरे भाग काहीही नव्हता.

मग जंगलात जातानाही जेन आपल्याबरोबर केळी घेऊन जाई. ग्रेबीअर्ड तिच्या भोवतीभोवती असे. तो तिच्याजवळ बसून राही. त्याच्या इतर बांधवांना या इतक्या प्रमाणात माणसाळलेल्या ग्रेबीअर्डचे नवल वाटे. कधी मग तिच्याजवळ केळी नसली तरी तो तिच्यापाशी बसून राही. 'हूऽऽ' पुकारून तो तिचे स्वागत करी.

नंतर ग्रेबीअर्डने आपल्याबरोबर एके दिवशी एकदोन मित्रही आणले. गॉलिएथ व विल्यम हे तिच्या कँपमध्ये प्रथमच येत होते. आतापर्यंत जेन



गुडऑल त्यांच्या जंगलात जात असे; आता सवयीने उलटा क्रम सुरू झाला ! प्रथम विल्यम व गॉलिएथ भित्रे, संकोची व लाजाळू होते. पण ग्रेबीअर्ड बरोबर एकदादोनदा आल्यानंतर त्यांचीही भीड मोडली. हे तिघेही तिचे दोस्त बनून राहिले.

कधी कधी यांचे चाळे तिला त्रासदायक होत असत. त्यांच्या 'मर्कटलीला' अभ्यासावयास ती उत्सुक होती हे खरे; पण एकदा असे झाले, की त्यांनी तिच्या राहुटीतील कपडेच नेले. काही पांघरुणे, ब्लँकेट्स, टॉवेल्स हे एकाएकी कमी होत राहिल्याचे तिच्या लक्षात आले. विल्यम हा या कामात अधिक हुषार होता. तिचा नोकर डोमिनिक तिच्या कपड्यांचे रक्षण करी; पण त्याचाही डोळा चुकवून एकदा विल्यमने सर्व कपाट मोकळे केले ! दोन पँट्स, दोन शर्टस एवढेच कपडे तिथे उरले होते ! पुढे बरेचसे कपडे सापडले ही गोष्ट निराळी. विल्यमनेच ते शेजारच्या जंगलात विखरून टाकले होते.

या तिघांची स्वभाव-वैशिष्ट्ये थोडी भिन्नभिन्न होती. ग्रेब्रीअर्ड हा त्यांच्यात खूपच शांत व 'सभ्य' होता. गॉलिएथ हा बलवान, अस्थिर, रागीट व वृत्तीने थोडाफार गोरिलासारखा होता, त्याच्या वागण्यात एक प्रकारची बेफिकिरी होती. जेन जेव्हा केळी देईनाशी झाली, तेव्हा तो असाच रागावला. त्याने ओरडायला सुरुवात केली; झपाट्याने चढून झाडाच्या फांद्या त्याने गदागदा हालविल्या. तो आपल्या मनातला राग नाना प्रकारांनी व्यक्त करी. विल्यम हा आपला असातसाच वैशिष्ट्यहीन चिंपांझी होता. त्याचे ओठ इतरांच्या मानाने मोठे असून त्याची मुद्रा नेहेमीच बावळी व करुण दिसे. तो तसा आळशीही होता. थंडीच्या दिवसात तीन दिवस तो आपल्या घरट्यातच पडून राहिला होता. पावसात तर त्याचे फारच हाल होत असत.

पाऊस सुरू झाला की चिंपांझी आपापल्या घरट्यात हातपाय आखडून, मान खाली घालून पडून राहातात. या भागात पाऊसही भरपूर असतो. पावसाळा मध्यावर आला की सर्वत्र, पुरुष दोन पुरुष उंच गवत उगवते. त्यातून चालणेही कठिण होऊन बसते. प्रथमप्रथमच्या पावसात काही चिंपांझी फारच चपळ बनतात. त्यांच्यात एक प्रकारचा उल्हास निर्माण होतो. त्या भरात त्यांचे चमत्कारिक खेळ सुरू होतात. जेन गुडऑलने त्यांना 'वर्षानृत्य' असे नाव दिले

आहे. त्याचे विस्तृत वर्णन तिने केले आहे.

नाना प्रकारची फळे, केळी चिंपांझींना आवडतात. वारुळातील वाळवी हे एक त्यांचे आवडते खाद्य आहे. काही प्राण्यांना मारूनही चिंपांझी त्यांच्या मांसावर ताव मारीत असतात. कधी इतर लहानसहान माकडांवरही भक्षणार्थ त्यांचा हल्ला होत असल्याचे गुडऑलने नमूद केले आहे. काही कीटकांचे भक्षणही चिंपांझींना मानवते. माश्या, मुंग्या, वाळवी यांवर ते ताव मारतात. यासाठी झाडाच्या फांदीचा त्यांना फार उपयोग होतो. आपणांस हवी तशी ते फांदी वाकवून, लहान-मोठी करून घेतात व एक साधे आयुध जणू ते करतात. ती वारुळात खुपसून त्यांची शिकार सुरू होते.

जेन गुडऑलने चिंपांझींच्या जीवनाचा असा हा जवळून अभ्यास केला आहे. कित्येक दिवस ती त्यांच्यात वावरली. त्यांना तिने जवळ केले. त्यांना गोंजारले. त्यांना खायला घातले. दोन्ही हातांत केळी घेऊन चिंपांझी तिच्या तंबूतून हिंडू लागले. ज्यांच्या आसपास हिंडणे-फिरणेही धोक्याचे वाटत होते, त्यांचा तिला एक प्रकारचा लळा लागला. आई इंग्लंडमध्ये निघून गेल्यावर तिचे छोटे हॉस्पिटल जेनने चालविले. आसपासच्या वसाहतींतून येणाऱ्या रुग्णांना ती औषधोपचारही करी. दहादहा मैलांवरून बंटू जमातीमधील पुरुष, बायका, मुले औषधासाठी येत असत. या माणसांनाही तिचा लोभ निर्माण झाला. तिच्या भोवतीभोवती असणारा ग्रेबीअर्ड चिंपांझी माणसात आल्याची खूण तिला एकदा विलक्षण रीतीने पटली. प्रथमप्रथम तो केळी सालीसकट खाऊन टाकी. पण एकदा त्याने केळ्याचे साल सोलून काढले, ते साल टाकून दिले व मग माणसासारखे खाल्ले. चिंपांझीमधील ही संस्कृती तिला नवलपूर्ण वाटली !

टांगानिका सरोवरानजीक असलेल्या राखीव जंगलामधील चिंपांझी माकडांचा लळा जेन गुडऑलला याप्रमाणे सतत लाभत राहिला. त्यांची राहणी, त्यांच्या सवयी, त्यांचे रागलोभ यांचा तिला चांगलाच परिचय झाला. एवढी दोस्ती या प्राण्यांशी झाल्यावर तिला परत इंग्लंडमध्ये यावे लागले, काही व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या. केंब्रिज विद्यापीठातील तिची परीक्षा तिला संपवायची होती आणि २८ मार्च, १९६४ या दिवशी आणखी एक घटना घडली. डॉ. लीकी यांच्या सल्ल्याने प्रसिद्ध छायाचित्रकार बॅरॉन ह्युगो व्हॅन

लॅविक हा गुडऑलसाठी जंगलच्या प्राण्यांची छायाचित्रे घेऊ लागला. जेनला प्राण्यांशी हितगुज निर्धास्तपणे करण्यासाठी एक वर्ष घालवावे लागले; पण बॅरॉन लॅविक ह्युगोने तीन महिन्यातच त्यांचा विश्वास संपादन करून छायाचित्रणास सुरुवात केली. २८ मार्च, १९६४ या दिवशी या डच छायाचित्रकाराशी जेनचे लग्न झाले. या पतिपत्नींनी चिंपांझींच्या जीवनाचा आणखी अभ्यास करायचे ठरविले.

दरम्यान त्यांना आफ्रिकेतून पत्राने बातमी समजली की त्यांच्या फ्लो हिला एक नवीन बेबी झाली आहे. या नव्या चिंपांझी बेबीस बघण्यास हे दोघेही अतिशय उत्सुक होते. लग्नानंतर तीनचार दिवसांनीच पुन: जेन गुडऑल आपल्या छायाचित्रणपटू पतीबरोबर टांगानिका सरोवराच्या काठी असणाऱ्या जंगलात येऊन स्थिर झाली. पुन: त्यांना जुन्या चिंपांझी मित्रांचे दर्शन होणार होते. काही नव्यांचा परिचय होणार होता. आता त्यांना नव्याने सर्व तयारी करण्याची जरुरी नव्हती. आसपासचे प्रमुख चिंपांझी चांगलेच माणसाळले होते. आता या दोनतीन माणसांची भीती त्यांना वाटत नव्हती, की या जंगली प्राण्यांची भीती जेन गुडऑलच्या परिवारास उरलेली नव्हती. या दुसऱ्या खेपेस जेन व ह्युगो चिंपांझीच्या वस्तीशेजारी उतरले तेव्हा एकसारखा पाऊस कोसळत होता. जेनला आपली ह्या पूर्वीची परिस्थिती आठवत होती. डोंगरदऱ्यांतून, दाट जंगलांतून हिंडताना आपणास किती त्रास झाला हे तिने जाणले. डेव्हिड, गॉलिएथ, विल्यम, फ्लो व तिची मुले यांची तिला तीव्रतेने आठवण झाली.

पाऊस थांबताच सामान लावण्याच्या तयारीत जेन व ह्युगो होते. ह्युगोच्या हातात काही केळी होती. ती पाहताच झाडावरून फ्लो चिंपांझी माकडीण खाली आली. आता माणसास भिण्याचे कारण नव्हते. तिची नवीन बेबी तिच्या पोटाला घट्टपणे बिलगून होती. ह्युगोकडून तिने शांतपणे केळ घेतले. या नव्या बेबीचे नाव या दांपत्याने पुढे फ्लिंट असे ठेविले. या नव्या प्राण्याचे किलकिले डोळे, आईच्या केसाळ अंगात खुपसले जाणारे इवलेसे तोंड, लहानसे हातपाय यांनी जेन व ह्युगो यांना गंमत वाटली. ही माकडे आपली ओळख विसरले नाहीत. नव्या बेबीस आपल्या समोर आणण्यात फ्लो हिला संकोच वाटला नाही, याचा फार मोठा आनंद उभयतांना झाला. पुन: जुन्या धड्याची नव्याने उजळणी सुरू


सागर

झाली. चिंपांझींच्या जीवनाचा शोध सुरू झाला. मध्येच थोडे विघ्न आले. पावसाने एक रेल्वेमार्ग उद्ध्वस्त झाल्यामुळे यांचा अन्नपुरवठा थांबला. लोणी, साखर, घरून येणारी पत्रे त्यांच्याशिवाय त्यांना काही दिवस काढावे लागले. अमेरिकेतील 'नॅशनल जिऑग्राफिक' नावाच्या मासिकातील जेन गुडऑलचे रोमांचकारी अनुभव वाचून पेरू देशातील एक डच तरुण मुलगी एड्ना कॉनिंग चिंपांझीच्या कळपात मिसळण्यास उत्सुक झाली. जेनची अनुमती येताच ती त्यांना येऊन मिळाली. सर्व प्रमुख चिंपांझींची माहिती तिने नव्या मैत्रिणीस दिली. म्हातारा विल्यम मात्र पुनः दिसला नाही. छायाचित्रावरून प्रत्येक चिंपांझी माकड कसे वेगळ्या रूपाचे आहे हे एड्नाने पाहिले. प्रत्येकाचा आवाज निराळा, प्रत्येकाचे चालणे निराळे, प्रत्येकाचे हावभाव निराळे, प्रत्येकास स्वतःचे म्हणून व्यक्तिमत्त्व आहे; अशी माहिती जेनने एड्नास दिली. फ्लो या म्हाताऱ्या चिंपाझी माकडिणीचे छायाचित्र पाहताच एड्नास प्रथमच शिसारी आली. फ्लो भारीच कुरूप दिसत होती. पण जेनने सांगितले, 'हीच फ्लो या जंगलात कित्येक माकडांची आवडती सोबतीण आहे !' खरोखरच फ्लो आता थकली होती. तिचे दात किडून पडले होते. तिचे बसके नाक अधिकच बेढब दिसत होते. तिचे कान फाटण्याच्या बेतात होते. हनुवटीचा भाग दिसेनासा झाला होता. पण ती अजूनही कळपाची प्रमुख कारभारीण होती !

जेन, ह्युगो, एड्ना यांचे चिंपाझी निरीक्षण पुनः सुरू झाले. गॉलिएथ, जॉन बुल, माइक, डेव्हिड ह्या जुन्या मित्रांची ये-जा सुरू झाली. पावसाळा संपत आल्यावर चिंपांझी माकडांच्या राहाण्याच्या पद्धतीतही बदल झाला. काही नवीन चिंपांझींची भर पडलेली त्यांच्या लक्षात आली.

भक्ष्य शोधण्याच्या उद्योगात असणाऱ्या अनेक चिंपांझींच्या धावपळीचा अभ्यास त्यांनी सुरू केला. केळ्यांचे आकर्षण तर प्रमुख होते. विलक्षण धिटाईने चिंपांझी तंबूत येऊन सलगी करीत असत. चाळीसपंचेचाळीस चिंपांझीपैकी काहींचा उपद्रव वाढू लागला. चोरट्या नजरेने येणे, केळी लांबविणे, कपडे कुरतडणे, कागदपत्रे खराब करणे, असले प्रकार वाढीस लागले. जेनची आई दोनतीन महिन्यांसाठी या कँपमध्ये येऊन राहिली होती. तिने घरी एक पत्र लिहिले व त्याची घडी घालून ठेवले व ती पाकीट आणण्यासाठी आतल्या

बाजूस गेली. परत येऊन पाहते तो पत्र नाही! थोडे निरीक्षण करून तिने पाहिले; समोर बसलेल्या लहानग्या फिगने पत्राचा चोळामोळा करून चावून त्याचा लगदा करून एका दगडावर ठेवून दिला होता!

एकदा जेन एकटीच जंगलामधून भटकत असताना एक भला मोठा चिंपांझी तिच्याकडे धावून आला. तिचा शर्ट तो ओढत होता. तो थोडा रागावलेलाही होता. जेनने सावधपणे शर्ट सैल करून त्याचे टोक पुढे केले. चिंपांझी शांत झाला व संथपणे शर्टचे टोक चघळत बसला. मॅकग्रेगॉर नावाच्या चिंपांझीस पक्ष्यांची अंडी भारी आवडायची. एड्नाने स्वत:च्या परिवारासाठी कोंबडीची सहा अंडी चांगली उकळवून तयार ठेवली होती. अंड्यावरही त्याचा डोळा होता.

चिंपांझीचे सारे विशेष आता त्यांच्या ध्यानात येऊ लागले होते. त्यांची बुद्धिमत्ताही त्यांच्या मानाने विशेष प्रकारची असल्याचे स्पष्टपणे अनुभवास येत होते. एकदा जेन व ह्युगो जंगलाच्या मध्यभागातून हिंडत असताना एका झाडावर त्यांनी 'एव्हरेड' नावाचा एक चिंपांझी पाहिला. बेटा स्वस्थपणे बसून होता, मध्येच त्याने झाडाची पाने तोडली, दाताखाली धरून चावली व पुन: ती बाहेर काढली. शेजारच्या खोलगट भागात तो चोथा बुडवून पुन: त्याने हात तोंडाशी नेला. हा एव्हरेड करतोय तरी काय? जेन व ह्युगो यांना प्रश्नच पडला. मग थोड्या निरीक्षणाने त्यांच्या लक्षात आले की, एव्हरेडला तहान लागली होती व तो पानांच्या चोथ्याचा 'स्पंज' बनवून पाण्यात बुडवीत असे व तो चघळून आपली तहान भागवीत असे. तहान भागविण्यासाठी हे असे 'मानवी' साधन वापरणाऱ्या एव्हरेडची बुद्धिमत्ता पाहून जेनला मोठे नवल वाटले! सर्वच चिंपांझींची एक पद्धत असल्याचे पुढे त्यांच्या ध्यानात आले. जेथे पाणी ओटांनी पिणे शक्य नसे तेथे चिंपांझी पानांचा 'स्पंज' करून आपली तहान भागवीत असत. जेन गुडऑल व तिचा पती यांनी अनेक संकटे सोसून चालू केलेल्या चिंपांझींच्या अभ्यासात आता वॉशिंग्टनच्या नॅशनल जिऑग्रॅफिक सोसायटीने अधिकृतपणे लक्ष घातले आहे.

■ ■ ■

# २ : एकटा मनुष्य चर्च बांधतो

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

कधी कधी सवड मिळताच मी देवळात जातो. देवाच्या दर्शनाची लालसा असते. देवळाचे स्वरूप पाहाण्याची कधी जिज्ञासा असते. देवाचे रूप पाहून मनाला प्रसन्नता वाटते, तर देवळाची परिस्थिती पाहून मन खिन्न होऊन जाते. देवळाच्या आसपास रोगी लोकांची, भिकाऱ्यांची गर्दी असते. पूजाद्रव्यांचा, प्रसादांचा बाजार असतो. अस्वच्छता तर सगळीकडे दिसते. देवळाच्या गाभाऱ्यात तर दर्शन घेणारांची केवढी गर्दी असते. कोण कोणत्या भावनेने आलेला असतो, याची चर्चा येथे करीत नाही. पण पुजाऱ्याचे कळकट वस्त्र पाहून व त्याची लोभस वृत्ती पाहून मन चरकते. तो दक्षिणेसाठी, देणगीसाठी लालचावलेला असतो; तर दर्शनासाठी येणारा 'भाविक' देवालाच नाना व्यावहारिक साकडी घालीत असतो.

कुणाला नवस करायचा असतो, कुणाला फेडायचा असतो. सर्वांनाच देवाकडून काहीतरी साधायचे असते. केवळ देवाच्या प्रीतीसाठी देवाकडे किती येतात ? आणि देवाच्या आवडीसाठी देवळाची व्यवस्था कोण पाहतो ? मंदिराची पडझड झालेली आहे, आत पशुपक्ष्यांनी निवान्तपणे निवारा पत्करला आहे, व्यसनी लोकांची समाजविरोधी अशी गुप्त कारस्थाने चालली आहेत, असेही वातावरण आजकाल देवळात दिसते. नवीन समाजमंदिरे उभारली जात असताना कित्येक चांगल्या बांधणीची ऐसपैस देवळे भकास व उजाड होत आहेत; तर काहींच्या भोवती ऐहिक लालसेचा व तीव्र झगझगाटाचा बाजार दिसत असत आहे.

अशा पार्श्वभूमीवर मला एका मंदिराच्या कथेची आठवण होते.

नुकतीच कुठेतरी ती माझ्या वाचनात आली. एक अगदी सामान्य मनुष्य, तुमच्या-आमच्यासारखाच; पण देव, धर्म यांच्या श्रद्धेवर अगदी याही नव्या विज्ञानयुगात मंदिराच्या उभारणीचे व त्याच्या परिपूर्ण व्यवस्थेचे केवढे लोकोत्तर कार्य करतो ! आणि ते कुठे ? तर जेथे नवीन शास्त्रीय ज्ञान, नवीन बुद्धिवाद, नवीन यांत्रिक जीवन फार काळापासून उभे आहे, अशा इंग्लंडमध्ये !

पंधरासोळा वर्षापूर्वीची ही हकीकत. इंग्लंडच्या आग्नेय भागातील पेकहॅम नावाचे एक लहानसे गाव. तेथील एक मोठे जुनाट चर्च आता कुणासच नको होते. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्यावर बॉंब पडून ते मोडकळीस आले होते. त्याचे छप्पर एका अंगाने कोसळू पाहात असून खिडक्यांची दारे खिळखिळी झाली होती. आतले फर्निचर अस्ताव्यस्त होऊन पडले होते. कारण पडझडीनंतर तिथे कुणी फारसे फिरकतही नव्हते. या चर्चच्या अनुयायांनी दुसऱ्या चर्चची वाट धरली होती.

आता या जीर्ण होत जाणाऱ्या चर्चचे करायचे काय ? अधिकाऱ्यांच्या पुढे व अनुयायांना एक प्रश्न पडला होता. हे चर्च पाडून टाकावे, काही बरा माल सापडला तर तोही विकून टाकावा व जागेस चांगला भाव आल्यास तीही विकावी, असा व्यवहारी विचार चालकांनी केला होता. पण यातही मोटीच अडचण होती. एवढे जुनाट चर्च पाडण्यासही मोटाच खर्च येणार होता. तो खर्च करण्यासाठी काहीशी हरकत होती. सर्वांच्या पुढे एकच प्रश्न होता; तो म्हणजे या जुनाट व मोडक्या चर्चचे काय करायचे ?

आणि याच वेळी चालकांच्यापुढे एक सर्वसाधारण व किरकोळ दिसणारा सामान्य मनुष्य येऊन उभा राहिला. त्याच्या मुखावर करारी वृत्तीचे तेज होते. डोळ्यांत विश्वासाची चमक होती, पण देहयष्टी किरकोळ असल्यामुळे या माणसाचे कर्तृत्व कुणासही समजून येण्यासारखे नव्हते. या साध्या व जगाच्या दृष्टीने अव्यवहारी माणसाचे नाव रेव्हरंड व्हिव्हिअन सिमॉन्स.

रेव्हरंडने चिंतामग्न चालकांनाच प्रश्न केला; "या जुन्या चर्चचे काय करणार आहात ? पाडून टाकणार आहात ! की विकणार आहात ?"

"हे चर्च आता आम्हाला नको आहे. पडूनझडून चालले आहे. सर्वच्या

ग्रा. क्र. 3024
विषय ७११.७१ 7/12/05



सर्व पाडावे व जागेचा अधिक चांगला उपयोग करावा असे मनात आहे. तुम्ही काही सुचविता ?"

चालकांनी एवढा खुलासा केल्यावर सिमॉन्सने विचारले, "मला द्या हे सर्व चर्च. पाडण्यासाठी मला एक पैसाही नको आणि मालाची किमतही तुम्ही मागू नये. मला हा सर्व माल हवा. मोकळी जागा तुमची तुम्ही घ्या. या विटा, दगड, लोखंडी गज, तावदाने, चौकटी मला उपयोगी येतील. येथून सतरा मैलांवर बिगिन हील नावाची वस्ती आहे ना, तिथे मला एक नवे चर्च बांधायचे आहे. येथला माल मी नीटपणे तिकडे वाहून नेईन. अंतरही फारसे नाही !"

या विक्षिप्त माणसाचे सारेच बोलणे नवलाईचे होते. आधी या मोडक्या चर्चमध्ये धड माल निघणार किती ? आणि या एकाकी माणसास हे एवढे अवाढव्य चर्च पाडण्याचे जमणार तरी कसे ? याच्या पाठीमागे कुठलीही संस्था नाही, कुठलीही संघटना नाही, याच्या बोलण्यावर विश्वास तरी कसा ठेवायचा ? कुणाच्या तरी मनात आले, 'एक चान्स तरी देऊन पाहावा.'

याच हेतूने कुणीतरी त्याला विचारले, "पण तुम्ही हे सर्व काम उरकरणार कसे ? आणि किती दिवसांत ?"

"मी स्वत: हे काम एकटा करीन. किती दिवस, ते कसे आताच सांगणार ?"

सबंध चर्च एकटा मनुष्य उतरविणार ? काहीतरी बिघाड या माणसाच्या डोक्यात नाही ना ? अशी शंका चालकांच्या मनात येऊन गेली, पण या तरुण व उत्साही माणसास एकदा संधी देऊन पाहाण्यास काय हरकत आहे ? नाहीतरी चर्च पाडण्यासाठी खर्च येणारच ना ? जर आयते काम होत असेल तर ? थोडा वेळ लागेल एवढेच.

या पार्श्वभूमीवर चालकांनी निर्णय घेतला; "रेव्हरंड सिमॉन्स, हे चर्च तुमच्या ताब्यात दिले आजपासून. तुम्ही कामाला लागा."

चालकांचा निर्णय येताच रेव्हरंडसाहेब कामाला लागले.

अगदी एकटे. हातात कुदळखोरे घेऊन अगदी वरच्या भागावर चढून, अलगदपणे एकेक वीट ते सैल करून बाजूला काढू लागले. आधीच विटा फुटल्या होत्या. आता आणखी फुटू नयेत म्हणून त्यांनी काळजी घेतली. वरच्या, अखेरच्या मजल्यावरील सर्व सामान सुरक्षितपणे खाली आणून पुन: ते सतरा

मैल दूर असणाऱ्या बिगिन हिलपाशी नेऊन पोचविणे ही पहिली मोठ्या जबाबदारीची गोष्ट होती !

आणि हे आव्हान व्हिव्हियन सिमॉन्स यांनी स्वीकारले होते ! चर्च काही लहान नव्हते. त्याची उंची ९० फूट होती. म्हणजे किमान पाचसहा मजल्यांची इमारत. त्याची लांबी १३० फूट व रुंदी ४३ फूट होती. एवढे मोठे चर्च धडपणे उतरविण्यास या एकट्या माणसास किती दिवस लागतील ? याचा विचारच त्याला करण्याचे कारण नव्हते. चर्चवरील निष्ठेने तो भारावून गेला होता. पाठीवर वाळूचे कण घेऊन निघालेल्या व रामाचा सेतू बांधावयास मदत करणाऱ्या खारीची श्रद्धा या किरकोळ माणसाच्या भक्कम मनात दृढ होती.

या अतूट श्रद्धेवर या थोर मनाच्या व चिवट वृत्तीच्या माणसाने हे पहिले अर्धे कार्य—चर्च संपूर्णपणे उतरविण्याचे—तीन वर्षात सतत एकट्याने काम करून पूर्ण केले ! केवढा प्रचंड उद्योग या धर्मनिष्ठ माणसाने केला !

काही तीनचार विद्यार्थ्यांनी थोडीफार मधून मधून मदत केली. एका म्हाताऱ्या सुताराने थोडाफार हातभार लावला, नाही असे नाही. परंतु बहुतेक सर्व कार्य या माणसाने एकट्याच्या हिंमतीवर पार पाडले. चर्च पाडणे व त्याच्या दगड-विटा सतरा मैल वाहून नेणे हा त्याच्या कामाचा पूर्वार्ध होता. मोठ्या जिकिरीचे, कष्टाचे काम हे ! भोवतीचे लोक हसायला, थट्टा करायला तत्पर होते. परंतु ख्रिस्तावरील निष्ठेचे मर्म त्यांना कुठे माहीत होते ?

या पहिल्या अर्ध्या कामासाठी या माणसाने केवढे परिश्रम केले ? बिगिन हिलच्या जाऊन-येऊन फेऱ्या करतानाच त्याचा प्रवास तीस हजार मैलांचा झाला ! त्याने एकूण १, २५, ००० विटा त्या ठिकाणी पोचत्या केल्या. ४०० टन दगड त्याला मिळाला. ४० टन लाकूड नीटपणे मिळाले. ७०,००० फरशीचे चतकोर त्याला प्राप्त झाले. अडीच टन लोखंड मिळाले. आणि नव्या चर्चच्या पायाभरणीसाठी मुरबाड माल तर ढीगभर एकसारखा मिळत राहिला. या मालास हस्तगत करण्यास या कष्टाळू माणसाचे दहा बुटांचे जोड फाटून गेले, तीस हातमोजे फाटून गेले. आणि नवलाईची गोष्ट अशी की, त्याचे वजन पंचवीस पौंडांनी घटले ! पण जेवढे वजन घटले, तेवढे त्याचे मनःसामर्थ्य वाढले ! कारण त्यास नवे चर्च उभे करावयाचे होते ! एकट्याच्या उभारीवर



बांधायचे होते ! आणि या बहाद्दुराने पुढील सहा वर्षे व आठ महिने या कालावधीत, एकट्याच्या जिवावर हे नवे चर्च उभे केले. 'चर्च ऑफ् सेंट मार्क' हे एक देखणे नवीन चर्च या लहान माणसाने अविरत कष्ट करून उभे केले !

आणि हा सर्व उद्योग चालू असताना रोजची कामे सुरू होती. त्यातून सुटका करण्याचे त्याच्या मनातही आले नाही. एक धर्मोपदेशक म्हणून त्याने आपली रोजची सर्व कर्तव्ये नीटपणे पाळली. मुलांना बाप्तिस्मा देणे, विवाहबंधनांना मान्यता देणे, अंत्यविधीची धार्मिक कामे करणे, रविवारी प्रवचन

देणे इत्यादी त्याची नित्याची कामे चालू होतीच. ही रोजची कामे करूनच हा जबरदस्त धर्माधिकारी एका नव्या चर्चच्या स्वप्नात गुंग होऊन गेला; आणि कुणासही अशक्य व हास्यास्पद वाटणारे हे स्वप्न त्याने खरे करून दाखविले ! बिगिन हिलच्या भोवतीच्या माणसांना रेव्हरंड सिमॉन्स देवदूत वाटल्यास नवल काय ? या लोकवस्तीस हा एक अद्‌भुत धर्मोपदेशक सन १९५१ मध्ये लाभला.

तो बिगिनहिल येथे आला तेव्हा या गावी फारसे चांगले चर्च नव्हते. पन्नास वर्षांपूर्वी कसेतरी बांधलेले एक तात्पुरत्या स्वरूपाचे मोडकळीस आलेले झोपडीवजा चर्च होते. कशीतरी सत्तर माणसे दाटीवाटीने त्यात बसत. आता भोवतीची लोकसंख्या वाढली होती. चर्चमध्ये येणाऱ्या लोकांची आवक वाढत होती. त्या सर्वांना सुखसमाधान देणारे नवे चर्च या गावी असावे अशी या नव्या धर्माधिकाऱ्यांची इच्छा होती. रोज नव्या अडचणी या जुन्या लहान चर्चमध्ये यायच्या ! एकदा तर एक थोडी मोठी असलेली प्रेतवाहक पेटी या छोट्या चर्चच्या छोट्या दरवाज्यामधून आतच येईना ! याच वेळी त्याच्या मनाने ठरविले; एक मोठे चर्च या गावी आपणच बांधावे ! पण नुसते मनात येऊन काय उपयोग ? इमारत बांधणे साधे काम असते का ? त्याला प्रथम कुणीच उत्तेजन देईना. नवे चर्च बांधायला कमीतकमी ५०, ००० पौंड खर्च येणार होता; आणि आतापर्यंत मोठ्या कष्टाने २६०० पौंडच जमा झाले होते ! लोकांनी आणखीही पैसे दिले असते; पण या किरकोळ माणसाच्या शक्तीवर कित्येकांचा विश्वास नव्हता ! अवघे ब्रम्हांड नव्याने उभारण्याची शक्ती दैवी प्रेरणेने या सामान्य दिसणाऱ्या माणसात आहे, हे लोकांना प्रथम उमगलेच नाही.

पण कुणाचीही पर्वा न करता रेव्हरंड सिमॉन्सने कामास प्रारंभ केला. १२ ऑगस्ट १९५२ रोजी ख्रिस्ताची मनोमन प्रार्थना करून त्याने एकट्याने सतरा मैल दूर असणारे एक जुने चर्च उतरविण्यास मोठ्या धडाडीने प्रारंभ केला. त्याला या नव्या कामाचा काहीच अनुभव नव्हता. उंच भिंतीवर चढताना त्याचे पाय लटपटायचे. त्याच्या डोळ्यांस अंधेरी यायची. कुदळखोरे, हातोडा इत्यादी हत्यारे बरोबर वागविताना फारच त्रेधा उडायची. पण एका महिन्याच्या अवधीत त्याला चांगला सराव झाला. कुदळीचे घाव घालून एकेक वीट त्याने धडपणे बाजूला काढली. घाव बसताच जवळच्या खोबणीत बसलेली कबूतरे उडून

जात. तेवढीच त्याला सोबत होती. याखेरीज प्रभू ख्रिस्त तर पावलोपावली व मातीच्या प्रत्येक कणाबरोबर त्याला धीर देत होता. तोच त्याचा एक आधार होता. काही विद्यार्थी त्याच्या मदतीला आले; पण त्यांना एवढ्या उंच भिंतीवर काम करणे जमले नाही. प्रौढांनी या 'वेडपट' माणसाकडे हसून पाहिले; क्वचित थट्टाही केली !

या माणसाच्या वेडसर कर्तृत्वाचे वर्णन दोनतीन ओळींत एका वृत्तपत्रात आले. एक जाणकार व धर्मनिष्ठ स्त्री कंत्राटदार होती. तिने आपला एक जुना ट्रक बहाल केला. या ट्रकमधून दगडविटा तो बिगिन हिलकडे नेणार होता. मग कुणी थोडी हत्यारे दिली. कुणी चांगले दोर दिले. कुणी उंच सांगाडे उभे करण्यासाठी सामान दिले. उंच सांगाडा उभा करण्यासाठी रेव्हरंड सिमॉन्सला फारच त्रास झाला. त्यावर चढणे व उतरणे हे काय या धर्माधिकाऱ्याचे काम ? पण नव्या चर्चसाठी त्याने हे जोखमीचे काम मनापासून केले. या दुबळ्या हातात एवढी अमाप शक्ती आली होती कुठून ?

चर्चवरील घंटा ज्या शिखरावरून वाजते ते शिखर उतरविणे तर फार धाडसाचे काम. चांगल्या सरावलेल्या माणसासही कठिण ! पुन: दगडविटांचा नाश होता कामा नये. थोडे चुकले तर खाली कोसळून मरणाची भीती ! पण या धर्मनिष्ठ धर्मोपदेशकास कसलीही भीती नव्हती. चर्चच्या छपरावरील टाइल्सही त्याने एकामागून एक अशा सावकाशपणे काढल्या. वीसवीस, पंचवीसपंचवीस अशा हप्त्यांनी त्या खाली तळमजल्याशी आणून ठेवण्यात आल्या. रोज शिड्यांवरून वर चढणे, उतरणे, उड्या मारून जाणे, तोल सांभाळणे, वीट-टाइल फुटत नाही याची काळजी घेणे, यातच रेव्हरंड सिमॉन्स गढून गेले. चर्चच्या लाकडी तुळया, खांब काढताना त्यांना फारच जिकिरीचे गेले. लाकूड चांगले मजबूत, ब्रिटिश कोलंबिया पाइनचे होते. पंचवीस फूट लांबीचे व अर्धा टन वजनाचे लाकूड उतरविणे सामान्य बाब नव्हती. हाताशी माणसे नव्हती. आधुनिक काळातील यंत्रबळ नव्हते. पण अनेक युक्त्या, प्रयुक्त्या करून त्याने हेही काम सफाईने करून सर्व तुळया ट्रकमध्ये चढविल्या.

त्याची धावपळ, त्याची धडपड पाहून आजूबाजूच्या लोकांना कीव यायची. हे काम त्याने सोडून द्यावे, एकट्याच्याने होणारे नाही, पैसा भरपूर पाहिजे अशा

कामांना, असला उपदेश करूनही झाली. या जीवघेण्या कामाचा उपयोग तरी काय ? असा व्यावहारिक प्रश्नही लोक उपस्थित करीत. पण या धैर्यशाली माणसाच्या वृत्तीत कसलाही फरक पडला नाही. त्या मोडक्या चर्चमध्ये भयाण शांततेत, या एकट्या माणसाची खटपट सतत सुरू असे. हिवाळ्यात, पावसाळ्यात काम करणे जिकिरीचे होई. पण त्याला खंत कसलीही नव्हती. त्याने छप्पर उतरविले. लाकूड सुरक्षितपणे बाहेर काढले, दगडविटा मोकळ्या केल्या, काही खांब अखंडपणे मिळविले. फरशीचे दगड त्याने सुरक्षितपणे मिळवून लॉरीत भरले. आणि सर्व सामान तेथून बिगिन हिल येथे नेले. तीन वर्षे चार महिने हे काम चालले होते.

आता नोव्हेंबर १९५५ मध्ये नव्या चर्चच्या उभारणीस प्रारंभ झाला. एक 'अशक्य' काम या दीर्घोद्योगी माणसाने करून दाखविले असल्यामुळे पुढच्या कामाबद्दलचा आत्मविश्वास त्याचा त्यासच आला होता. लोकांची उदासीनताही थोडी कमी झाली. चोहोकडून सहानुभूतीचे शब्द मिळत राहिले. आता आपल्या गावास खरेच नवे चर्च मिळणार, या खात्रीने लोकही सुखावले गेले. त्यांनी मदतीचा हात पुढे करण्याची तत्परता दर्शविली.

सर गिल्स् गिलबर्ट स्कॉट या मोठ्या स्थापत्य शास्त्रज्ञाच्या मदतीने नवीन चर्चचा प्लॅन तयार झाला. आता नाही म्हणणारे कुणीच नव्हते. कुठल्याही कामास दिरंगाई नव्हती. चाळीस महिने एकसारखे काम केल्यावर सिमॉन्सने एकदोन दिवसांची विश्रांती घेतली; आणि पुन: नव्या दमाने कामास प्रारंभ झाला. प्रथम नव्या चर्चची जागा साफसूफ करण्यात आली. नवीन हत्यारे आली, नवीन रस्ते तयार झाले, इमारतीच्या प्लॅनप्रमणे जमिनीवर आखणी झाली. पाया खणला गेला. काँक्रीटच्या कामात नवे चर्च वर येत राहिले. त्याला विटा घालता येऊ लागल्या. त्याला सिमेंटचे मिश्रण चांगले कसे करता येईल हे ध्यानात आले. त्याला निष्णात गवंड्याचे कामही साधून गेले. काही दायका व बॉयस्कॉऊटची मुले यांच्या मदतीने थोड्याच दिवसांत नव्या चर्चच्या भिंती १८ फूट उंचीवर येऊन मोठ्या दिमाखाने उभ्या राहिल्या. नवीन खिडक्या शोभिवंतपणे बसून चर्चचे रूप डोळ्यात भरू लागले.

या नव्या उद्योगात सिमॉन्सचे मन चांगलेच रमून गेले. दरवाज्यावर,

कमानीवर कलाकुसर कशी बसवायची हे त्याने या विषयाची पुस्तके वाचून जाणून घेतले; थोडे निरीक्षण केले आणि हे नवे चर्च अधिक सुंदर व रूपवान कसे होईल, याबद्दल दक्षता त्याने मनापासून घेतली. या नव्या चर्चच्या ५७ खिडक्यांना त्याने बेल्जम काचेचे गुलाबी रंगाचे तुकडे मिळविले व त्यावर बायबलमधील प्रसंगचित्रे सुबकपणे स्वत: काढली ! त्याची ही कृती त्याच्या सल्लागार स्थापत्य शास्त्रज्ञांसही नवलाची वाटली. काही लोकांनी काम उरकण्यासाठी आणखी मदत देण्याचे ठरविले. काम बरेचसे उभे राहिलेले पाहून सिमॉन्सनेही मदत आनंदाने स्वीकारली. परंतु त्याला स्वत:ला करण्यासारखी आणखी किती तरी महत्त्वाची कामे होती.

मोटमोठी यंत्रे कशी चालवायची हेही ज्ञान त्याने संपादन केले. छपरावरील टाइल्स क्रेनने वर कशा चढवायच्या, बसवायच्या कशा हेही त्याने समजावून घेतले. छप्पर झाले, भिंती झाल्या, लाकूडकाम व्यवस्थित झाले, दारेखिडक्या तयार झाल्या. काचेचे रंगीबेरंगी काम नजरेत भरू लागले. आता या नव्या चर्चला शोभेल असे नवे फर्निचर नको का? कुणी तरी उदार माणसाने या कामासाठी देणगी दिली. तिच्या साह्याने त्याने चांगले लाकूड खरेदी केले. गावातील सुतारांच्या मदतीने नवे फर्निचर आकारास येत राहिले. भिंतींवर भव्य आकारातील चित्रे लोकांच्या डोळ्यांना तृप्त करू लागली. धर्मभावनेचे बळ या चित्रांच्यामुळे वाढीस लागले.

सर्व दिशांनी आता सर्व प्रकारची मदत रेव्हरंड सिमॉन्स यांना होत राहिली. कुणी ऑर्गन दिला, कुणी शोभेच्या वस्तू दिल्या, कुणी फुलांच्या कुंड्या दिल्या, कुणी मुलींनी लाकूडकामास उत्तम पॉलिश दिले. आता चर्च पूर्णावस्थेत येऊन शोभिवंत दिसू लागले. या नव्या चर्चमध्ये ३५० माणसे सहज बसू शकतील अशी व्यवस्था होती. २५ एप्रिल, १९५९ रोजी चर्चमधील घंटानादाने गावातील सारे लोक धर्मभावनेने पुलकित झाले. गावास नवे चर्च मिळाले ! एकट्या माणसाने आपल्या हिंमतीवर उभारले याचे आणखी कौतुक !

व्हिव्हियन सिमॉन्सचे स्वप्न सत्यसृष्टीत उतरले. पाचसहा वर्षे अविरत श्रम करून ख्रिस्तावरील श्रद्धेमुळे एक सुंदर चर्च स्वत:च्या हिंमतीवर त्यांनी उभे केले, स्वत:च्या हिंमतीवर ! सिमॉन्सची भावना वेगळीच होती. हे चर्च पूर्ण

झाले तरी त्याला स्वस्थता लाभली नाही. गावातली लोकांनी, स्त्री-पुरुषांनी, मुलांनी वारंवार येथे यावे, बायबलचे धडे घ्यावेत, त्यांच्या सभा येथे व्हाव्यात, संमेलने व्हावीत, गावातील सर्व चांगल्या चळवळीचे केंद्रस्थान म्हणून या चर्चविषयी लोकांच्या मनात प्रीती निर्माण व्हावी, अशी त्याची इच्छा होती. त्याने या चर्चला जोडण्यासाठी नवीन हॉल्सच्या नवीन योजना आखल्या. या माणसाला अडचण अशी कसलीही नव्हती. स्वत: काम करण्याची धमक व हौस असल्यामुळे त्याने या पाचसहा वर्षांत सोळा प्रकारच्या नवीन कामांची माहिती करून घेतली. या धर्मोपदेशकाला आता काय येत नव्हते? लॉरी ड्रायव्हर, विटा घालणारा, गवंडी, सुतार, विजेचे फिटिंग करणारा, चित्रकार, टाइल्स बसविणारा, सोनार, लोहार, साधा बिगारी अशा अनेक भूमिका करून या प्रवचन करणाऱ्या धर्मोपदेशकाने कित्येक कामे सुबकपणे केली होती.

"तुम्ही एकट्याने ही सर्व कामे कशी केली हो?"

कुणी मोठी माणसे कौतुकाने या लहान दिसणाऱ्या माणसास विचारीत.

त्यावर तो आत्मविश्वासाने उत्तर देई : "मी एकटाच कामे करीत होतो असे लोकांना उगाच वाटे. वास्तविक मी एकटा असा कधीच नव्हतो. मी त्या सार्वभौम प्रभूसाठी रात्रंदिवस एकसारखा खपत होतो. तो माझ्याजवळ सतत काळजी घेण्यासाठी तत्परतेने असे. त्याच्या छायेत मला विश्रांती होती. मी एकटा कुठे आहे? त्याच्या सोबतीसारखी दुसरी छाया कुठली?"

हे त्याच्या परिश्रमांचे मर्मच नव्हे काय?

■ ■ ■

# ३ : अनामिकाचा भीषण अंत

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

दोन–अडीचशे वर्षांपूर्वीची हकीकत !

कॅप्टन मॉसन हा हिंदुस्थानातून इंग्लंडकडे जाणाऱ्या बोटीने अटलांटिक महासागरातील असेन्सिअन या बेटाशी आला होता. दक्षिण अटलांटिकमधील ब्रिटिशांची सेंट हेलिना कॉलनी याच्याच आसपास असल्याने या लहानशा बेटास पूर्वीपासून फारच महत्त्व होते. दुसऱ्या महायुद्धातही अमेरिकेचा विमानतळ याच बेटावर होता. बेट अगदी लहान, क्वचित डोंगराळ, वाळवंटाने युक्त व बहुदा निर्जन असे होते.

या बेटास कॅप्टन मॉसनची बोट लागली. थोडा वेळ गंमत म्हणून मॉसनने बेटाच्या भूमीवर पाय ठेवला. किनाऱ्यापासून थोड्या दूर अंतरावर त्याला एका लहानशा टेकडीशी लागून एक मोडकातोडका तंबू दिसला. तंबूच्या प्रवेशदाराशीच भयानक दृश्य होते. एक हाडांचा सांगाडा अस्ताव्यस्त होऊन पडला होता. एखाद्‌दुसरे भांडे, पाण्याची लहानशी बादली, एखादा फाटका कपडा, एवढाच संसार तंबूत होता. सर्वत्र मांसाची, रक्ताची दुर्गंधी पसरली होती. या तंबूचा मालक काही दिवसांपूर्वी मरण पावला असावा व पशु-पक्ष्यांनी त्याच्या उरल्यासुरल्या मांसावर ताव मारून त्याला कायमचे मुक्त केले असावे.

कॅप्टन मॉसनच्या मनात नाना प्रकारचे विकल्प येऊन गेले. या निर्जन बेटावर हा मनुष्य आला कुठून ? या बेटावर त्याला काय शोधायचे होते ? कोणत्या उद्देशाने तो तेथे आला ? किती दिवस तो येथे होता ? त्याचा येथे अशा प्रकारचा भीषण अंत का व कसा झाला ? याला कोणी नातेवाईक होते

डच जहाजावरील अधिकाऱ्यांनी अनामिकाची अगदीच सोय पाहिली नव्हती असे नाही. काही दिवस पुरेल इतके गोडे पाणी एका मोठ्या पिंपात भरून त्यांनी त्याच्याबरोबर दिले होते. एक्र लहानसा कोयता, दोन लहान बादल्या, तवा, थोडे तांदूळ, ताडपत्री, किटली, थोडे कांदे, थोडे वाटाणे, तंबूचे सामान असे काही मोजके पदार्थ त्या बेटावर त्याच्या सोबतीस होते. एखादे पुस्तक त्याच्या करमणुकीस त्याच्या जवळ होते. बायबलचा आधार त्याला या विपदप्रसंगी मोठाच होता.

अनामिकाने मोठ्या कष्टाने पण धीराने, येणाऱ्या सर्व संकटांना तोंड द्यायचे ठरविले. त्याने एका मोठ्या खडकाचा आधार घेऊन आपला लहानसा तंबू उभा केला. थोडेसे कपडे बरोबर होते ते नीट लावून ठेवले. आणि उदास मनःस्थितीत ती रात्र त्याने कशीबशी काढली. त्याला झोपही आली नाही. या विलक्षण बेटावर काय काय संकटे येतील; कुणाचे तरी जहाज किनाऱ्यावरून जाईल का ? आपल्याला त्यावर ते घेतील का ? आपली ओळख तरी कुणास पटेल का ? आपण आता एकट्याने हे पुढले दिवस काढावयाचे ना ? दिवस इकडेतिकडे भटकण्यात जातील; पण रात्री काय करायचे ? सारे बेट चोहोबाजूंनी खायला येईल तेव्हा काय करायचे ? या विकल्पात्मक प्रश्नांच्या वावटळीत अनामिकाची रात्र संपली.

दुसऱ्या दिवशी तो तंबूच्या बाहेर आला. त्याने सभोवार पाहिले. उजाड, ओसाड वाळवंट भोवती पसरले होते. तंबूच्या मागे लहानशी टेकडी होती. टेकडीच्या पलीकडे काही हिरवळ असेल का ? थोडा भाजीपाला; थोडी फळे मिळतील का ? अशी शंका उगाचच अनामिकास आली. मोठ्या आशेने त्याने टेकडीवर चढून पाहिले. त्याची फार निराशा झाली. दूरवर लहान लहान टेकड्या व अगदी ओसाड असा प्रदेश पसरला होता. झाडांची, झुडुपांची नावनिशाणीही नव्हती. आता पुढले दिवस कसे काढायचे ? कुणाचा आसरा घ्यायचा ? येथील निर्जीव खडकांचा ? घोंगावणाऱ्या वाऱ्याचा ? अनामिकास गोंधळल्यासारखे झाले. त्याचे धैर्य डळमळले. कृतकर्मांचा पश्चात्ताप झाला. येणाऱ्या संकटांतून कसे दिवस काढायचे, हेच त्याला नीट उमगेना. एका ईश्वराखेरीज त्याला आता दुसऱ्या कुणाचीही सोबत नव्हती.

दिवसभर बेटावरील खडकाळ वाळवंटाच्या प्रदेशात भटकून तो परत तंबूकडे येण्यास निघाला. ईश्वराने दया करावी व आपली या अज्ञातवासातून मुक्तता व्हावी, अशी आशा त्याच्या मनात तरंगत होती. दिवसाच्या श्रमाने तो थोडासा थकला होता. जवळच्या अन्नाची सामग्री बेतानेच खर्चायची होती. म्हणून संध्याकाळच्या सुमारास त्याने खडकाच्या कपारीमधील दोनतीन पक्षी मारले, सोलून काढले, मिठात घोळून मावळत्या सूर्यकिरणांत थोडे सुकविले आणि त्यांच्यावरच ती रात्र त्याने घालविली. त्या पक्ष्यांचे मांस त्याला रुचकर लागले त्या वेळी.

दि. ७ मे रोजी त्याने आपल्या उजाड संसारास थोडे नीटनेटके स्वरूप दिले. तंबूपासून दूर अंतरावर त्याने पाण्याचे पिंप ठेविले होते, ते त्याने तंबूच्या जवळ आणून उभे करण्याचा प्रयत्न केला. या खटाटोपात त्यातले बरेचसे पाणी सांडून गेले. पाणी असे वाया घालवून चालण्यासारखे नव्हते. गोड पाण्याचा थेंबही मिळेल न मिळे, अशी येथली परिस्थिती असताना काय संकट उभे राहील याचा काही नेम नव्हता. त्यानंतर त्याने आपल्या तंबूशी एक पांढरे निशाण आपल्याच एका फाटक्या शर्टचे बनविले व ते शेजारच्या टेकडीवर उभे केले. हेतू हा की, येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांच्या कप्तानांना या निर्जन बेटावरील गरीब माणसाच्या वास्तव्याची चाहूल लागावी. त्याने आपल्या तंबूची नीट दुरुस्ती केली. भोवतीची जागा थोडी साफसूफ करून स्वच्छ केली. भांडी नीट लावली. अन्नसामग्रीचा अंदाज घेतला.

त्याचा दैनंदिन कार्यक्रम सुरू झाला. त्याच्या ध्यानात प्रथमच आले की, या बेटावर लहानमोठ्या कासवांची वस्ती चांगलीच आहे. कासव पकडायला व शिकार करायलाही त्या मानाने सोपे. त्याने एक कासव मारले. त्याचे मांस त्याला चवदार वाटले. रोज सकाळ संध्याकाळ किनाऱ्यावर येऊन, दूरवर दृष्टी टाकून कुठे जहाजाची खूण दिसते की काय, याची मोठ्या आशेने तो टेहळणी करी. कुणी तरी येऊन आपली सुटका करतील अशी त्याला फार मोठी आशा होती. ईश्वरावर विश्वास ठेवून तो कसेतरी दिवस काढीत होता. संध्याकाळी पक्ष्यांच्या मांसावरच तो वेळ भागवून नेण्यास शिकला. सकाळच्या प्रहरी तंबूतून बाहेर पडून भटकावे, वनस्पतींचा शोध घ्यावा, खडकाच्या कपारी न्याहाळून

'थ्रेशर' बुडाली. एवढी चांगली व नव्या सोयींनी युक्त असणारी नवी 'थ्रेशर' बुडाली ! सर्वांच्या चर्चेत तोच विषय होता. टेलिव्हिजनवर ही वार्ता असल्यामुळे साऱ्या देशातील कानाकोपऱ्यात याच विषयाची चर्चा होत राहिली.

थोड्याच वेळात शेफर्ड जेंक्स आला. त्याने मुलांचे सांत्वन केले. मिसेस हार्वेला धीर दिला. एवढ्यात 'आपण येत आहोत' असा फोन फिलाडेल्फियाहून तिच्या वडिलांचा आला. मॅनिसोटा व पेनसॅल्वानिया येथे तिच्या दोन बहिणी होत्या. त्यांचेही फोन आले. साऱ्या नातेवाईकांना एकाच वार्तेने घाबरून सोडले होते. मुलांच्या वडिलांचे आईवडील व चुलते यांनीही आपण येत असल्याचे कळविले.

रात्री काही जवळचे नातेवाईक घरी येऊन पोचले. रात्र कशीबशी काढली. सकाळी नाविक दलाचे दोन अधिकारी दारात उभे राहिले. जे घडले असल्याची वार्ता होती, ती खरी असल्याचे त्यांनी निश्चयाने सांगितले. अनेकदा कानांवर वार्ता आली, तरी ती कदाचित खोटी ठरण्याची शक्यता थोडी होती; ती आता पूर्णपणे दूर झाली. थ्रेशर बुडाली होती. आपल्या दोन्ही लहान मुलांना जवळ घेऊन इरिन हार्वेने समजुतीने सारे दुःख गिळून सांगितले:

"वेस्ली, ब्रुस ! आपली थ्रेशर खरंच बुडाली बरं ! डॅडी आता परत येणार नाहीत घरी." मुले स्तब्ध होती. आई शांत होती. कुणाच्याही डोळ्यांत या वेळेस पाणी आले नाही.

एक दोन दिवसांनी मात्र कुणालाच शोक आवरेनासा झाला. तिघेही मुक्त कंठाने रडले. तिघांनाही काय झाले, काय घडले हे समजेनासे झाले. 'थ्रेशर खरेच बुडाली ?' ह्या एका प्रश्नाभोवती त्यांची मने फिरत होती. छोट्या ब्रुसने एक लहानसे रंगीत थ्रेशरचे चित्र काढले व ते आईस दाखविले. थ्रेशर समुद्राच्या तळाशी गेलेली होती आणि तिच्यावरील ध्वज मात्र डौलाने या चित्रात तळपत होता !

अणुशक्तीवर चालणारी थ्रेशर पाणबुडी हा अमेरिकेचा मोठाच गौरव होता. अणुशक्तीच्या विजयाचे ते एक चिन्ह होते. गेल्या दहा वर्षांत, अणुशक्तीचे जे विविध उपयोग माणसाच्या ध्यानी आले होते व ज्या मार्गांनी शास्त्रज्ञांनी पावले टाकली होती, त्यात अणुशक्तीवरील बोटी व पाणबुड्या बोटी यांचे महत्त्व

विशेष होते. सारे जग अमेरिकेसारख्या संपन्न देशाच्या या नव्या पाणबुड्यांकडे कौतुकाने पाहात होते. सन १९५५ साली अमेरिकेची पहिली अणुशक्तिचलित पाणबुडी—नॉटिलस—हिने सागरावरील एका नव्या युगास प्रारंभ केला. पाणबुड्यांसाठी, पृष्ठभागांवरील बोटींसाठी एक नवे इंधन उपलब्ध झाले होते. अणुशक्तीवर बोटी प्रत्यक्ष मार्ग आक्रमू लागल्या होत्या. गेल्या दहा वर्षातील या क्षेत्रातील प्रगती आश्चर्यकारक होती. नॉटिलसने तर एकदा नव्हे दोनदा उत्तर ध्रुवाखालील बर्फातून प्रवास करून साऱ्या जगास थक्क करून सोडले होते. स्केट, सॅरगो, सी ड्रॅगॉन इत्यादी यासारख्याच पाणबुड्या आता समुद्रसंचारास सिद्ध झाल्या होत्या. 'ट्रिटॉनने' जगप्रवास पूर्ण करून अणुशक्तीच्या यशाची खात्री करून दिली होती. 'जॉर्ज वॉशिंग्टन'सारख्या पाणबुडीने रॉकेटसारख्या अस्त्रफेकीचे प्रयोगही यशस्वी करून दाखविले. लाँग बीच, एंटरप्राइझ, बेनाब्रिज इत्यादी आणखी युद्धनौकांची भर नव्याने पडत राहिली. 'एंटरप्राइझ' तर जगातील सर्वांत मोठी बोट होती. तिचे वजन ८५, ३५० टन असून, अनेक विमानांची ने-आण ती करू शकणारी होती.

अमेरिकेचे वैभव वाढविणाऱ्या ह्या पाणबुडी बोटीत थ्रेशरचे महत्त्व विशेष होते. पहिल्या दर्जाची असणारी ही पाणबुडी नव्यातली नवी होती. समुद्राच्या पाण्याखालून जाणाऱ्या इतर पाणबुडींना शोधून काढण्याचे वा नष्ट करण्याचे कार्य तिचे असताना, ती स्वतःच एकाएकी नाहीशी झाली होती. अमेरिकन शास्त्राची व यांत्रिक विद्येची प्रगती किती झाली आहे, याचे मोठे गौरवास्पद चिन्ह म्हणजे थ्रेशर होती; हिच्यावरील अधिकारीही विशेष काळजी घेऊन निवडले होते. त्यांना शिक्षणही विशेष प्रकारचे दिले होते.

गेल्या दहापंधरा वर्षांत पृथ्वीवरील सर्व कानेकोपरे, सागरांचे तळ व अंतराळ विभाग हुडकून काढण्यात माणसाने पराकाष्ठेचा प्रयत्न केला आहे. १९५७-५८ साली सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय भू-भौतिक वर्षानिमित्ताने सर्व दिशांनी माणसाची चौकस दृष्टी संशोधन करीत राहिली. मानवाने दोन ध्रुवांवर स्वामित्व मिळविले, वाळवंटे शोधून काढली, सागरांच्या अंतरंगाचा ठाव घेतला, एव्हरेस्टच्या शिखरावर पाय ठेवला. चंद्रलोकावर धडक घेतली, अणुशक्तीचे मानवी हितार्थ जे जे उपयोग शोधता आले ते शोधून काढले. दुसऱ्या

3028


महायुद्धानंतरच्या काळात पूर्वीचे अनुभव व गरजा लक्षात घेऊन अमेरिकेने अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्या तयार करून, आरमारी इतिहासात एक नवे पर्व सुरू केले. या पाणबुडीचा वेग अधिक होता. अधिक खोल जाऊन त्या संचार करीत होत्या. त्या अधिक कार्यक्षम अशा यंत्रसामग्रीने समृद्ध होत्या. काही पाणबुड्या बोटी, पूर्वी दोनतीनशे फुटांखालूनच शत्रूला न दिसेल अशा प्रकारे पाण्यातून जात असत; पण अणुशक्तीवर चालणाऱ्या या नव्या बोटी काही हजार फूट खोल जाऊनही संचार करू शकत होत्या आणि ह्या सर्वांत 'थ्रेशर' अग्रगण्य होती. तिचा दिमाख खराच अभिमानास्पद असतानाही तिच्यावर संकट आले होते !

१० एप्रिल, १९६३ रोजी एक भीषण नाट्य घडले. न्यू इंग्लंडच्या किनाऱ्यावर अटलांटिक महासागरात २६० मैल दूरवरच्या जागी 'थ्रेशर' एकाएकी बुडाली व ८४०० फूट खोल असणाऱ्या सागरतळाशी जाऊन विसावली. ह्या बोटीचे दर्शन समुद्राच्या पृष्ठभागावर कुणासच होणारे नव्हते; म्हणून नेमके काय घडले हे समजले नाही. पृष्ठभागावरून हिंडणाऱ्या व 'थ्रेशर'बरोबर काम करणाऱ्या 'स्कायलार्क' नावाच्या बोटीस मात्र ९वाजून १३ मिनिटांनी पाण्याखालून टेलिफोन संदेश आला :

*"काही किरकोळ व बारीकसारीक अडथळे होत आहेत . . .*
*आणखी काही घडेल ते कळवूच."*

'थ्रेशर'ला नेमकी कोणती अडचण आली व अपघात कसा होत राहिला हे कुणासच समजले नाही. पुढे 'थ्रेशर'कडून कोणताच संदेश आला नाही. कुठल्या तरी भयानक संकटात 'थ्रेशर' आहे अशी शंका सर्वांना येत राहिली; पण 'थ्रेशर' नेमकी कुठे आहे, तिच्या संकटाचे स्वरूप नेमके काय आहे, ह्या विषयी अंदाज कुणालाच नव्हता. पृष्ठभागावर असलेल्या बोटीचे संकट सहज लक्षात येऊ शकते; पण 'थ्रेशर'सारख्या पाणबुडीच्या बाबतीत काहीच समजू शकले नाही. आधी नुकतीच बांधलेली 'थ्रेशर' अशा रीतीने एकाएकी बुडेल याची कल्पना कुणासच नव्हती ! त्यामुळे नेमके काय घडले याचाही अंदाज अधिकाऱ्यांना लागेना.

सर्वत्र एकच धांदल, गडबड— अमेरिकन नौका विभागात, आरमारात उडून

गेली. अमेरिकेच्या विज्ञानाला, यंत्रविद्येला एक जबरदस्त असे आव्हान होते. नवी पाणबुडी बुडत असताना आपण तिला वाचवू शकत नाही, याची मोठीच खंत जाणत्यांच्या मनात सतत बोचत राहिली. जिने दुसऱ्या बोटींना, शत्रूच्या बोटींना उद्ध्वस्त करावे ती स्वतःच समाप्त होते ? या घटनेचा अर्थच कुणास समजेना; आणि आपण काहीही यासंबंधी करू शकलो नाही, याचे तर फार मोठे दु:ख अमेरिकन आरमारातील लोकांना वाटले.

'थ्रेशर' आपण वाचवू शकलो नाही याची उणीव, तिचा आता तरी शोध करून भरून काढायची, असा निश्चय अधिकाऱ्यांनी केला. अमेरिकन नेव्हीच्या सर्व विभागांनी 'थ्रेशर' शोधून काढण्याचा आटोकाट प्रयत्न करण्याचे ठरविले. अमेरिकन आरमाराचे वैभव वाढत्या गतीचे होते.

सन १९५९ सालापासून या खात्याने 'टेनॉक'—टेन इयर ओशनॉग्रॅफिक प्रोग्रॅम — योजना मोठ्या उत्साहाने हाती घेतली होती. समुद्राच्या अंतरंगाचे जास्तीत जास्त ज्ञान मिळविले जाणार होते. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर, जॉन केनेडी व जॉन्सन यांनी वेळोवेळी ह्या योजनेस प्रोत्साहन दिले. राष्ट्रीय पातळीवर सागर-संशोधनाचे कार्य व्हावे असेही ठरले. या योजनेनुसार नव्या नव्या पाणबुड्या बोटी तयार होत होत्या. नव्या साहसांना प्रवृत्त होत होत्या. या सर्व उत्साहाला 'थ्रेशर'ने एक प्रकारचे आव्हानच दिले होते ! 'थ्रेशर'ने साऱ्या बुद्धिवंतांच्या विचारशक्तीस जणू झोडपून काढले होते. अमेरिकन वैज्ञानिकांना 'थ्रेशर'ने त्रस्त करून सोडले.

अमेरिकन अधिकारी व तंत्रज्ञ 'थ्रेशर'ला वाचवू शकले नाहीत; पण तिला शोधून काढण्याचे आव्हान मात्र त्यांनी स्वीकारले. मोठी अवघड कामगिरी होती ती ! अमेरिकन किनाऱ्यापासून दोनशे साठ मैल दूर असणाऱ्या अटलांटिक समुद्राच्या, कुठल्या तरी एका विभागात, मैल-दीड मैल खोल असणाऱ्या समुद्रतळाशी 'थ्रेशर' विश्रांती घेत होती. नेमके स्थान कुणासच माहीत नव्हते. अथांगपणे पसरलेल्या सागरात कुठलाही अवशेष दृष्टीस पडत नसताना; कुठे म्हणून शोध घ्यायचा ? किती वेळ घ्यायचा ? कसा घ्यायचा ? पण यासारख्या सर्व प्रश्नांना तोंड द्यायचे व 'थ्रेशर' शोधून काढायची, हीच एक जिद्द अमेरिकन आरमाराच्या अधिकाऱ्यांना होती.

अमेरिकन अधिकाऱ्यांनी ताबडतोब त्यांच्याकडे असणारी प्रसिद्ध पाणबुडी 'ट्रिस्टी' बोलावून घेतली. या विख्यात पाणबुडीचा लौकिक फार मोठा होता. खोल जाऊन सागरतळाचा व सागराच्या अंतरंगाचा शोध घेण्यासाठी ही एकमेव पाणबुडी अमेरिकन आरमाराने तयार केली होती. हिच्या तळाशी एक मोठा वर्तुळाकार पोलादी गोल समुद्राच्या निरीक्षणासाठी होता. याची निर्मिती प्रसिद्ध स्विस शास्त्रज्ञ, ऑगस्ट पिकार्ड याच्या सहाय्याने झालेली असून, त्यास नावही बॅथिस्कॅप-डीप बोट या अर्थाचे होते. अंतराळात एखादे बलून फिरत राहावे त्याप्रमाणे या पाणबुडीचा हा विभाग समुद्राच्या अंतरंगात विहार करू शकतो. सहाच वर्षांपूर्वी जॅक्वीस पिकार्ड व डॉन वॉल्श यांनी या पाणबुडीबरोबर समुद्रात सन १९६० साली ३५, ८०० फूट खोल जाऊन एक नवा विक्रम प्रस्थापित केला होता. आणि असे अनेक विक्रम करण्यास ती सिद्ध होती. आता येथे तर फक्त आठ हजार फूट खोल जाऊन तपास करायचा होता ! 'ट्रीस्टी'च्या लौकिकाच्या तुलनेने ही अगदीच मामुली बाब होती.

कॅलिफोर्नियात सॅन्‌डिगो येथे असलेली ही लौकिकवान पाणबुडी पनामा कालव्यातून बोस्टन येथे येऊन पोचली व इतर अनेक सहाय्यक बोटींबरोबर 'ट्रीस्टी' आपल्या महत्त्वाच्या कामासाठी निघाली. 'थ्रेशर' नेमकी कुठे बुडाली याचा शोध आधीच्या प्रयत्नांनी थोडाफार घेतला होता; तरी तिला शोधून काढणे हे महत्त्वाचे कार्य उरले होते. हिंदी महासागराच्या संशोधनात गुंतलेली अटलांटिक-२, हीही पाणबुडी बोलावून घेण्यात आली होती. पूर्वी 'थ्रेशर'वर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे साह्य घेण्यात आले. सर्व अधिकाऱ्यांनी कसून शोध घेण्याचे ठरविले. कष्टाने व धीराने प्रयत्न करून दहा चौरस मैलांचे क्षेत्र संशोधनासाठी निश्चित करण्यात आले. पण पुढचे काम सोपे नव्हते — समुद्र किती खोल आहे ? 'थ्रेशर' कुठे विसावा घेत आहे ? सागराचा तळ कसा आहे ? तळामधील धोका किती मोठा आहे ? यासंबंधी कसलाच अंदाज नव्हता. अनेक प्रयत्न करून शक्तिमान कॅमेरे, टेलिव्हिजन यांच्या मदतीने समुद्राच्या अंतरंगांची व तळाची कित्येक छायाचित्रे घेण्यात आली. 'ट्रीस्टीने' लेफ्ट. कमांडर डोनॉल्ड कीच या कर्तबगार अधिकाऱ्याच्या सहाय्याने, अनेक बुड्या घेऊन 'थ्रेशर'चा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

अटलांटिक मर्यादा किती विस्तारपूर्वक ! फारशा खुणा अद्यापि हाती आलेल्या नव्हत्या. परंतु बोस्टनपासून तीनशे मैलांवर कीच व मॅकेन्झी यांचे एकसारखे प्रयत्न 'ट्रीस्टी' च्या साह्याने सुरू झाले. या सज्ज पाणबुडीच्या पहिल्या पहिल्या प्रयत्नांना काहीही यश आले नाही. या बोटीवरची यंत्रसामग्री 'थ्रेशर' शोधण्यात किती उपयोगी पडणार ? अशीही शंका त्यांच्या मनात येऊन गेली. आणखी दहापंधरा मिनिटे सागरतळाशी राहाण्याची परवानगी कीचने मागितली व पुन: संशोधन सुरू झाले. आणखी खोल जाऊन निरीक्षण करण्यात आले. एकाएकी दूरवर तळाशी प्लॅस्टिकच्या कव्हरचा एक बूट आढळला. त्यावर धातूची पट्टी होती. संरक्षणासाठी असलेली ही वस्तू अवघ्या तीन फुटांवर पडलेली दिसत होती. तिचा अर्धा भाग दुमडून गेला असल्याने, तिच्यावरील अक्षरे अस्पष्ट झालेली होती. थोडा आणखी प्रयत्न करून संशोधकांनी तिच्यावरची अक्षरे वाचण्याचा प्रयत्न केला.

"S...S...N...5–"

बस; एवढीच अक्षरे दिसली. बुडालेल्या 'थ्रेशर'चा नंबर S S N–593 असा होता.

'थ्रेशर'चा तपास लागण्याचे चिन्ह सापडले. आणखीही काही खुणा हस्तगत झाल्या. पण ह्या बारीकसारीक खुणा म्हणजे काही 'थ्रेशर' पाणबुडी नव्हे. जवळपासच 'थ्रेशर' बुडालेली आहे, इतकेच फार तर यामुळे नक्की झाले एवढेच. संशोधकांनी सभोवतीच्या प्रदेशाची भराभरा अनेक छायाचित्रे घेतली आणि कीच व मॅकेन्झी सागराच्या पृष्ठभागावर आले. 'थ्रेशर'चा सुगावा लागला होता. पण संशोधकांची महत्त्वाकांक्षा अशी होती की, प्रत्यक्ष 'थ्रेशर' सापडावी. इतर साह्यकारी बोटींच्या कॅमेऱ्यांनी घेतलेल्या, असंख्य छायाचित्रांच्या मदतीने दहाच्याऐवजी दोन चौरस मैल क्षेत्राची जागा निश्चित करून, पुन: 'ट्रीस्टी'च्या बुड्या सुरू झाल्या.

सन १९५३ सालापासून या पाणबुडीने सागरसंशोधनाच्या कामी फार मोठे विक्रम केलेले असल्याने, आठ हजार फूट खोल असणारा समुद्रतळ तपासणे तिला फारसे कठीण नव्हते. सर्व प्रकारच्या आधुनिक सामग्रीने ही बोट समृद्ध होती. संशोधक चांगले तत्पर व साहसास प्रवृत्त होणारे होते. कीच



व मॅकेन्झी पुन: पुन्हा खोलवर जाऊन सागरतळाचे निरीक्षण करीत होते. 'थ्रेशर'चे अवशेष तरी सापडतात की काय हे पाहात होते. जसजसा खोल पाण्यात ते प्रवेश करीत, तसतसा त्यांचा आत्मविश्वास वाढत होता. 'थ्रेशर' त्यांच्या मनातून आकार घेत होती. एका बुडीच्या वेळी ते तीन हजार फूट खोल ट्रीस्टीबरोबर गेले. सर्व प्रकारची साधनसामग्री त्यांनी पुन: पुन्हा तपासून पाहिली. जरा कुठेही यंत्रसामुग्रीत उणीव राहू नये म्हणून सावधगिरी घेण्यात येत होती. सहा हजार फुटांखालून बॅथॅस्केपमधील काचांतून त्यांना नाना रंगांचे मोठमोठे मासे दिसू लागले. ट्रीस्टीच्या शक्तिमान प्रकाशात असंख्य लहान व पांढऱ्या रंगांच्या माशांचे नृत्य मोठे मजेदार वाटले त्यांना. ८४०० फूट खोल गेल्यावर

आपण तळाशी आलो असे संशोधकांना समजले.

समुद्राचा तळ आता स्पष्टपणे दिसत होता. सावकाशपणे स्थिर झाल्यावर तळावरचे काही प्राणी; स्टारफिश व काही बिळे यांचे दर्शन त्यांना झाले. सागराच्या तळावर लहानमोठे वाळूचे खडे सर्वत्र पसरून राहिले होते. 'थ्रेशर' सापडण्याची चिन्हे मात्र नव्हती. उंचसखल भाग मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे अनेक पाणबुड्या जवळपास असूनही या तळावरून न दिसण्यासारखी परिस्थिती होती. चारपाच तास शोध घेतल्यानंतर संशोधक हताश होऊन, वर सागराच्या पृष्ठभागावर आले. त्यांना कसलेच यश मिळाले नव्हते ! मग पुन: चौथ्या खेपेस, पाचव्या खेपेस बुडी मारून, पुन: शोध घेणे एवढेच त्यांना करता येण्यासारखे होते. ते त्यांनी मनापासून केले. निराशा, अपयशाची भावना त्यांच्या मनास कधीही स्पर्श करीत नव्हती. सहा-सात वेळा असे प्रयत्न झाले. आठव्या खेपेस कमांडर जेम्स डेव्हिस, लेफ्ट. कमांडर ऑर्थर गिल्मोर यांच्याबरोबर कीच याने पुन: सागराचा तळ गाठला. 'थ्रेशर' पाणबुडीची बरीच माहिती ऑर्थर गिल्मोर यास होती.

दोन-तीन तास सागरतळाचे संशोधन केल्यावर काही आशा संशोधकांच्या मनात निर्माण झाली. काही खुणा त्यांना पटू लागल्या, आणि थोड्याच वेळात ते अशा स्थानाशी येऊन पोचले की, जिथे थ्रेशरचे सुटे अवयव अस्ताव्यस्त पडले होते ! हा ऑगस्ट महिना होता. 'थ्रेशर' बुडाली एप्रिल महिन्यात. चार-पाच महिन्यात या वैभवसंपन्न पाणबुडीची जी दुर्दशा झाली, ती संशोधकांनी समुद्रतळाशी प्रत्यक्ष पाहिली. अस्ताव्यस्त पसरलेले अनेक लहानमोठे तुकडे, बॅटरी प्लेट्स, केबल्स, यंत्राचे विभाग, इतर सामग्रीचे अवशेष यांनी तळ भरून गेला होता.

दीर्घ प्रयत्न करून मोडक्यातोडक्या अवस्थेत का होईना; पण 'थ्रेशर' सापडली होती. अमेरिकन आरमाराने स्वीकारलेले आव्हान व्यर्थ गेले नाही. पाच महिन्यात चिकाटीने केलेले प्रयत्न वाया गेले नाहीत. सर्व तळावर फिरून त्यांनी प्रत्येक अवशेषाची छायाचित्रे घेतली. असंख्य असे धातूंचे तुकडे सर्वत्र विखुरलेले होते. संशोधकांनाही ते दृश्य पाहताना मोठेच दु:ख झाले. स्तब्ध राहून त्यांचे निरीक्षण चालू होते. अनेक लहानमोठे मासे 'थ्रेशर'च्या मोडक्या

विभागाच्या आश्रयाने 'घर' करून सुखावले होते.

मोठ्या कष्टाने ट्रीस्टीवरच्या संशोधकांनी एक मोठा पाइप हस्तगत केला. वेळ होत असल्याने संशोधक 'थ्रेशर'चा हा एकमेव भाग घेऊन वर आले. पाइपवर खूण होती –593-Boat–थ्रेशर सापडल्याचा हा फार मोठा पुरावा होता. अमेरिकन संशोधकांना या यशामुळे समाधान झाले. 'थ्रेशर'ला वाचविणे जमले नाही; पण तिचा तपास लावता आला हेही थोडे नव्हते. वास्तविक पाहता 'ट्रीस्टी'ने अशा प्रकारचा शोध प्रथमच केला होता. तिला या कामाचा तसा अनुभव नव्हता. यापूर्वी तिने अमेरिकन नेव्हीसाठी सागरसंशोधनार्थ सत्तर बुड्या घेतल्या होत्या आणि आता १९६३च्या ऑगस्ट महिन्यात तिने 'थ्रेशर'चा शोध लावून आपली नवीन उपयुक्तता सिद्ध केली होती. जानेवारी १९६४ मध्ये 'ट्रीस्टी'मध्ये आणखी महत्त्वाच्या सुधारणा होऊन, ती आणखी नव्या संशोधनास सिद्ध झाली. 'थ्रेशर' का बुडाली, ती कशी बुडाली याचाही शोध घेण्यास ती तत्पर झाली.

'थ्रेशर' समुद्राच्या तळाशी गेली; पण तिचे अवशेष पाच महिन्यानंतर का होईना पण सापडले. तिच्यावरील १२९ खलाशी ? त्यांचे काय झाले ? त्यात संशोधक होते, अधिकारी होते, निरीक्षक होते. त्यांचा काहीच पत्ता लागला नाही. थ्रेशरबरोबर त्यांनी बलीदान केले हे खरे; पण त्यांच्या मनातील काहूराचे काहीच चिन्ह उरलेले नव्हते. येणाऱ्या संकटांस त्यांनी कसे तोंड दिले ? किती धैर्याने ते वागले ? काहीच माहिती मिळण्यासारखी नव्हती. कर्तबगार अमेरिकन आरमाराचे अधिकारी मोठ्या धैर्याने वागले असतील् यात शंकाच नाही. याची साक्ष या बोटीचे कप्तान जॉन वेल्सी हार्वे यांच्या पत्नीने थोडीफार दिली आहे. अर्थात तिने प्रत्यक्ष काहीच पाहिले नाही; पण जॉन वेल्सी हार्वे किती धीराचा व कर्तव्यतत्पर होता हे तिला माहीत होते. त्याच्याच उदाहरणावरून ती संकटप्रसंगी खंबीर राहण्यास शिकली होती. 'The Courage of a Submariner's Wife' या शीर्षकाने तिचे रोमहर्षक निवेदन प्रसिद्ध झाले आहे.

ती व तिची दोन लहान मुले यांची कशी अवस्था 'थ्रेशर'च्या भयानक बातमीमुळे झाली, याचे तिने फार संयमाने व मोठे समर्थ असे निवेदन केले आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांनी व आरमाराच्या लोकांनी तिला मदत केली. तिचे

सांत्वन केले. जगातील कानाकोपऱ्यातून तिच्यावर सांत्वनपर पत्रांचा वर्षाव झाला. नेव्हीच्या इतर अधिकाऱ्यांच्या बायकांनी तिला फुलासारखे जपले. काही कमी पडू दिले नाही तिला. तिचे व तिच्या मुलांचे कपडे धुणे, त्यांना इस्त्री करणे, जेवणाची व्यवस्था पाहणे, घर स्वच्छ ठेवणे; ही कामे महिनाभरपर्यंत तिला करावी लागली नाहीत. त्यांची एक चांगली मोटरकार होती. ती ज्याच्या दुकानातून त्यांनी घेतली होती, त्या दुकानदाराने तिच्या दारात एक नवी कोरी गाडी आणून उभी केली. पतीने चालवलेली गाडी चालविताना बाईस फार वेदना होतील म्हणून त्याने ही काळजी घेतली होती ! अनेक वकिलांनी, आपण होऊन सर्व कायदेशीर सल्ला बोटीवरील सर्व लोकांसाठी देण्याचे मान्य केले. झालेले दु:ख काही कमी नव्हते; बुजणारे नव्हते. पण लोकांच्या ह्या विलक्षण सहानुभूतीने मात्र इरिन हार्वे व तिची मुले यांचा दु:खभार मात्र पुष्कळच हलका झाला. पत्रे, तारा, टेलिफोन, संदेश यांना तर मर्यादाच नव्हती.

नव्याने लग्न झालेल्या एका ग्रीक दांपत्याने तारेत म्हटले होते, "आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करीत आहोत."

"सारी रात्र आम्ही थ्रेशरसाठी प्रार्थना करीत होतो." असे एका रोमन कॅथॉलिक धर्मनिष्ठावान स्त्रीने कळविले.

"आम्ही तुमचे अर्धे दु:ख सहन करू." असे कोरियातील विद्यार्थ्यांनी कळविले.

अशीच पत्रे अनेक डॉक्टर्स, इंजिनिअर्स, धर्मोपदेशक यांच्याकडून या धीराच्या स्त्रीस आली.

आपला पती काही नव्या व महत्त्वाच्या संशोधनाच्या कामगिरीवर असताना मरण पावला, याचा एक विशेष अभिमान इरिन हार्वे हिला होता. या अभिमानापोटी तिचे दु:ख बोथट झाले. आपल्या पतीचे आपल्यावर फार प्रेम होते; पण तिने हेही जाणले की, तितकेच प्रेम त्याचे त्याच्या कर्तव्यावर होते, संशोधनावर होते, थ्रेशरवर होते. आपण आपल्या पतीच्या या प्रेमासही आपल्या अंत:करणात थारा द्यावयास पाहिजे असे मानून, तिने आपला दु:खभार हलका केला. पतीचा दीर्घोद्योग व त्यांची कर्तव्यनिष्ठा मनात वागवून, आपल्या दोन मुलांकडे पाहून तिने आयुष्य तितक्याच धैर्याने काढायचे ठरविले.

लग्न झाल्यापासून नाही तरी पती सदैव आपल्याजवळ कुठे असे ? जेव्हा त्याच्या सोबतीची विशेष गरज होती, तेव्हाही तो दूर पाणबुडीवर, एखाद्या नव्या साहसास प्रवृत्त झालेला असायचा. जणू पाणबुडीशीच त्याचे लग्न झाले होते ! ह्या मुलांचे टॉन्सिल्सचे ऑपरेशन झाले, मुलांना शालेय खेळात बक्षिसे मिळाली— अशा सुखदु:खाच्या प्रसंगी त्यांच्या वडिलांनी जवळ असायला हवे होते ना ! पण हा नादिष्ट व साहसप्रिय कप्तान सदैव पाणबुडीशी हितगुज करीत राहिला होता. मग इरिन मुलांची समजूत काढी, "वेस्ली, डॅडींना फार अभिमान वाटेल तुमचा. . . आपण या सर्व गोष्टी त्यांना पत्राने लिहून कळवू या."

पतीच्या कर्तव्यप्रेमावर व साहसप्रियतेवरच ती खूष होऊन गेली होती. त्याच्याबरोबर तिने अनेक सत्कार-समारंभ अनुभवले होते. अनेक प्रसंगी तिने त्याला निरोप दिले होते. इरिन स्वभावत:च धीराची व शांत होती.

नर्सचे शिक्षण घेत असतानाच काही वर्षांपूर्वीचा एक प्रसंग तिला आठवला. एक लहान मुलगा अपघातात सापडून मरणाच्या पंथास लागला होता. इस्पितळात त्याला आणल्याबरोबर उपचार सुरू झाले. मुलाच्या वडिलांची दयनीय व करुणापूर्ण अवस्था पाहून इरिन रडू लागली. प्रमुख नर्सने तिला आपल्या खोलीत नेले व तिच्या दोन्ही गालांवर चापट दिल्यासारखे करून म्हटले, "तू नर्स कशी होणार ? थांबव हे रडणे. जा त्या बापापाशी; त्याला तुझी मदत हवी."

प्रसंगी धीर धरण्याचे शिक्षण तिने या प्रसंगातून घेतले होते. सर्वत्र विखुरलेली सहानुभूती व प्रेमवृत्ती तिच्या भोवती केंद्रित झाल्यावर, तिला एक प्रकारचे बळ आले. आपण थोर कप्तानाची पत्नी आहोत ही जाणीव तिला तीव्रतेने झाली.

उरलेल्या १२८ लोकांच्या घरी जाऊन, आपण खरे म्हणजे त्यांच्या परिवाराचे सांत्वन करायला हवे, असे तिला वाटले. शेवटी तिने १२८ पत्रे लिहिली. सर्वांना धीर तिनेच दिला.

नर्सचे शिक्षण घेत असताना तिच्या वर्गात ज्या मैत्रिणी होत्या, त्यांनी तिला ताजी टपोरी फुले भेट म्हणून पाठविली. या गुलाबपुष्पांनी तिचे धैर्य आणखी

वाढले. तिच्या धैर्यवान पतीच्या स्मृती तिला आणखी कणखर बनवीत होत्या.

ध्रुवाची सफर करून 'नॉटिलस' परत आली तेव्हा सर्व संशोधकांचे – त्यात तिचा पती होताच – जे भव्य स्वागत न्यूयॉर्कला झाले ते तिच्यासमोर नित्य उभे राही. त्याच्या गौरवाचे व सन्मानाचे प्रसंग तिला धीर देणारे असताना तिने घाबरून काय म्हणून जावे ?

शेवटच्या प्रसंगी 'सी ड्रॅगॉन' या पाणबुडीचा प्रमुख अधिकारी म्हणून त्याची नेमणूक झाली. 'स्केट' नावाच्या दुसऱ्या एका पाणबुडीबरोबर ही सी ड्रॅगॉन पाणबुडी प्रवासास जाणार होती. हवाई बेटांवरून त्यांना निरोप देण्याचा समारंभ झाला. बोटीवरील अधिकाऱ्यांच्या बायकांना बोटी नेमक्या कुठे जात आहेत, याचा नक्की अंदाज नव्हता. तेथल्या प्रथेप्रमाणे त्यांनी आपल्या पतींच्या गळ्यात फुलांची भरदार कडी घातली !

याच प्रवासात असताना वेस्ली हार्वे यास 'थ्रेशर'वर जाण्याची आज्ञा झाली. रेडिओवरील संदेशाने ही आज्ञा आल्यामुळे तिचे महत्त्व त्याने ओळखले व तो 'थ्रेशर'चा प्रमुख कप्तान बनला. नॉर्थ पोल–उत्तर ध्रुवाच्या–बर्फाखालचे स्थान सोडून तो परत 'थ्रेशर'साठी आला. "या आपल्या नव्या बदलणाऱ्या साहसाने तुम्हास काय वाटते ?" असे त्याने इरिनला पत्र पाठवून विचारले होते.

अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुडीचे शिक्षण संपल्यावर त्यास एक पदक मिळाले होते. त्यावर लिहिले होते, 'O, God, thy sea is so great and my boat is so small.' – (परमेश्वरा, तुझा सागर अमर्याद आहे; त्या मानाने माझी बोट किती लहान, किती क्षुद्र –)

आणि हेच खरे ठरले. शेवटी अटलांटिक महासागर अमर्याद ठरला व 'थ्रेशर' त्याच्या कुशीत जॉन वेस्ली हार्वेसहित विसावली. हे महत्त्वाचे पदकही त्याच्याबरोबर गेले. नाविक अधिकाऱ्यांनी नंतर त्याची दुसरी प्रतिकृती इरिन हार्वेला घेऊन दिली. याच आधारावर ती मोठ्या धैर्याने जगणार होती, मुलांना वाढवणार होती. 'I am a Navy wife' – मी कप्तानाची पत्नी आहे – या वाक्यावरच ती उभी होती.

■ ■ ■

# ५ : यात्रेकरू अग्निमुखात

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

तांबड्या समद्रात एक लहानसे जहाज डौलाने उभे आहे.

उतारूंची गडबड विलक्षण आहे. सामानासुमानांची ने-आण, इंग्लिश, फ्रेंच व अरेबियन भाषांच्या मिश्रणाचे उच्चार, धावपळ, धांदल यांनी बोटीभोवतीचे वातावरण धुंद बनून गेले आहे. बोटीपासून थोड्या अंतरावर असलेल्या अरबस्तानाचा किनारा व त्यावरील जेद्दा बंदर यांची हालचाल मावळत्या सूर्यकिरणांत विशेष लक्षात राहण्यासारखी नव्हती. बोटीवरील जो तो प्रवासी, आता शक्य तितक्या लवकर घरी जाण्यासाठी उत्सुकलेला होता. प्रत्येकास घरची, घरच्या बायकापोरांची, व्यवसायाची, धंद्याची आठवण येत होती. उतारूंपैकी बहुतेक सर्वजण मक्केचे दर्शन घेऊन आलेले मुस्लिम यात्रेकरू होते. यात्रा यथासांग पूर्ण झाल्याचे व मक्केच्या सहवासाचे समाधान सर्व स्त्री-पुरुषांच्या चेहेऱ्यांवर झळकत होते. मक्केच्या मशिदीमधील काबाच्या दर्शनाने प्रत्येकजण सुखावलेला होता; आणि हे सुखसमाधान बरोबर घेऊन, जो तो परत घरी जाण्याच्या धांदलीत होता.

ह्या मुस्लिम यात्रेकरूंची गडबड-धांदल बोटीचा कप्तान मार्शंद स्वस्थचित्ताने पाहात होता. 'एस्. एस्. एशिया' या बोटीच्या कप्तानास हा प्रसंग नवा नव्हता. गेली कित्येक वर्षे तो अशा यात्रेकरूंची ने-आण करीत असे. अनेक मुस्लिम स्त्री-पुरुष पै-पै साठवून मक्केच्या यात्रेसाठी आपली पुंजी राखून ठेवतात. फार गरिबीने राहाणाऱ्या यात्रेकरूंना मक्केच्या यात्रेनंतर अलौकिक समाधान मिळत असते. त्यांना उन्हाचा त्रास होत नाही ! वाळवंटातील रणरण कष्टदायक वाटत

नाही ! डोंगराळ भागातील वणवण त्रासाची वाटत नाही ! जेद्दा बंदरापासून मक्केचे स्थान पंचेचाळीस मैल तरी असेल. हे अंतर कुणी गाढवांवरून, कुणी उंटावरून तोडतात. पण बहुतेक गरीब यात्रेकरूंना पायीच रखडावे लागते. मक्केचे दर्शन होणार, मुहंमदाचे जन्मस्थान पाहावयास मिळणार म्हणून जाताना लोक खुषीत असतात. त्यांना चाळीस-पंचेचाळीस मैलांचे चालणे कष्टदायक वाटत नाही. आणि मनसोक्तपणे मक्केचे दर्शन घेतल्यानंतर तृप्तीने तुडुंब झालेले यात्रेकरू आणखीनच सुखी व समाधानी होऊन परतत असतात. कारण आता पवित्र यात्रेकरू हाजी नावाने ओळखले जाणार असतात. त्यांच्या आयुष्यातील एकमेव स्वप्न सफल झालेले असते.

अशा गरीब पण समाधानी यात्रेकरूंची धांदल एशिया बोटीचा कप्तान लक्षपूर्वक पाहात होता. त्याच्याही मनात एकदा मक्केस जावे असे पुनः पुन्हा येई. पण तो मुस्लिम नव्हता. म्हणून त्याचा काही इलाज चालण्यासारखा नव्हता. त्यामुळे केवळ मक्केच्या भोळ्याभाबड्या पण श्रद्धाळू यात्रेकरूंच्या ने-आणीवरच तो संतुष्ट होई. त्याने तीस वर्षांची हयात तरी सफरी करण्यातच काढली होती. मक्केच्या यात्रेच्या दिवसांत तो आपल्या जहाजाबरोबर अनेक फेऱ्या करून, यात्रेकरूंना मक्केस पोचवी, तेथून त्यांना त्यांच्या देशांच्या जवळच्या बंदरांमध्ये सोडी. अरब व सोमाली यांचाच मुख्य भरणा ह्या उतारूंत असे.

२१ मे, १९३० या दिवशी एशिया बोटीचा कप्तान आता जेद्दा बंदर सोडण्यासाठी यात्रेकरूंसारखाच उत्सुक होता. त्यानेच हे दीड हजार यात्रेकरू आपल्या बोटीवरून अरबस्तानच्या किनाऱ्यावर आणले होते. आणि आता तांबड्या समुद्राच्या दक्षिण टोकास फ्रेंच सोमालीलॅण्डच्या जिबुती या बंदराशी तो अखेरचा मुक्काम करून यात्रेकरूंना परत भूमीवर सोडणार होता. बोट जेद्दा बंदरापासून थोड्या अंतरावर उभी राहिली होती. आता कुणी बोटीवर येण्याचे राहिले नव्हते.

दुपारपर्यंत सर्व यात्रेकरू आपापल्या समानासुमानांसहित स्थिर होत राहिले. सूटकेसेस, कॉफीची भांडी, पत्र्याचे डबे, कपडे इत्यादींसहित यात्रेकरू आपापल्या जागी स्थिर झाल्यानंतर कप्तानाने विचार केला – 'आता रात्रीचे आठ वाजत आहेत. उद्या सकाळच्या प्रहरी आपली बोट निघायची आहे. आज रात्री चांगली

झोप घेता आली तर पाहावी. एकदा प्रवास सुरू झाला म्हणजे झोप मिळेलच असे नाही.' सुमारे एक हजार मैलांचा प्रवास आता उद्यापासून सुरू व्हायचा होता. सारे यात्रेकरू घरी जाण्यास उत्सुक होते. आपल्या मुलाबाळांत जाऊन मिसळण्याची ऐहिक ओढ त्यांच्या मनात सहजच निर्माण झाली होती.

कप्तान आपल्या खोलीत विश्रांती घेत असतानाच त्याचे काही अधिकारी दूर अंतरावर उभ्या असणाऱ्या अशाच यात्रेकरूंच्या बोटीशी संपर्क साधीत होते. दूरच्या एका बोटीवरील अधिकाऱ्याने 'एशिया' बोटीवरच्या अधिकाऱ्यास बिनतारी संदेशाने विचारले,

"काही विशेष बातमी ?"

"काही विशेष सांगण्यासारखे नाही. सर्व ठीक आहे. अच्छा, गुडनाइऽऽट—"

'एशिया' बोटीवरील हा संदेश जाऊन पाचच मिनिटे झाली.

त्यानंतर एक विशेष घटना घडली. बोटीवरील एक सेवक धावत धावत लगबगीने कप्तानाच्या केबिनपाशी आला व त्याने घाबऱ्या घाबऱ्या सांगितले,

"सर, सेकंड-क्लासच्या एका केबिनमध्ये आग भडकली आहे ! वाढते आहे सारखी ! फार मोठा धोका दिसतो आहे सर . . . . !"

कप्तान खडबडून जागा झाला. तीस-पस्तीस वर्षांच्या बोटीवरील आयुष्यात अनेक भलेबुरे प्रसंग त्याने अनुभवले होते; आताचा प्रसंग कोणत्या स्वरूपात वाढून पुढे येत आहे, या प्रश्नाचा विचार करीत असतानाच त्याने चटकन अंगात जॅकेट घातले. तो खोलीच्या बाहेर आला. आग मोठी आहे. आटोक्यात येणे कठिण असल्याची माहिती आणखी एका अधिकाऱ्याने कप्तानास दिली.

कप्तान मोठ्या धीराचा मनुष्य, बोटीवरील जीवनाचे नियम त्याला चांगले ठाऊक होते. सर्व उतारूंचे प्राण वाचविणे हे त्याचे प्रथमचे कर्तव्य होते. कारण आग आता थोड्याच अवधीत सर्व बोटीत पसरेल हे त्याच्या ध्यानात आले होते. त्याच्या कानांवर थोड्याच वेळापूर्वी उत्साही, आनंदी, समाधानी, दिसणाऱ्या यात्रेकरूंच्या किंकाळ्याही येत राहिल्या. पुन: गडबड, धावपळ, पळापळ, आरडाओरडा, भीतीच्या आरोळ्या, बायकांचे रडणे यांनी 'एशिया' बोटीवरचे वातावरण दणाणून गेले ! सर्वत्र उतारूंचा भीतीने थरकाप उडालेला होता. अशा प्रसंगी कोण कुणास विचारणार ? जवळची नातीही संपतात. मग मित्रभावाने

होणारी मदत दूरच. जो तो आपले प्राण वाचविण्याच्या खटपटीत राहाणार. आणि प्राण तरी कसे वाचणार? जेद्दा बंदर दूर आहे. वेळ रात्रीची. अगदी जवळ अशा अंतरावर मदत देणारी एकही दुसरी बोट नाही.

एशिया बोटीचा कप्तान धीराने उभा राहिला !

त्याने सर्व परिस्थितीचा एका क्षणात अंदाज घेतला.

तो आपल्या अधिकाऱ्यास म्हणाला, "लाइफबोटीच्या सहाय्याने या सर्व उतारूंना प्रथम बंदरावर पोचवू या आपण."

त्याने बोटीबरोबरच्या लाइफबोटींकडे दृष्टी टाकली ! तो एकदम दचकून गेला ! त्या लहान लहान बोटींनीही पेट घेतला होता ! प्राण-संरक्षक बोटींचा प्राण मोठ्या संकटात पडला होता. त्या बोटी कसल्या या यात्रेकरूंना वाचविणार ? आता मात्र कप्तानाची मती गुंग होऊन गेली. अशात यात्रेकरूंचा गोंगाट वाढला. त्यांच्यातील पुष्कळांनी बोटीचा प्रवास प्रथमच केलेला होता. त्यांना तर या संकटाने पृथ्वीच दुभंगल्यासारखी झाली. सर्व यात्रा सुखरूपपणे पार पडली व आता समाधानाने घरी जायचे, शेतावर कामे करायची. धंदा, व्यवसाय वाढवायचा. मुलाबाळांना, बायकांना खूष करायचे– या स्वप्नात दंग असणाऱ्या भोळ्या-भाबड्या यात्रेकरूंच्यापुढे आता आगडोंबाळ उभा होता. यातून वाचण्याची शक्यता त्यांना तर मुळीच उमगत नव्हती. धुरांच्या लोटांकडे, अग्नीच्या ज्वाळांकडे पाहता पाहता त्यांच्या चिमण्या डोळ्यांतून अक्षरश: करुणा भीतीच्या रूपाने गळू लागली. आता या भयानक संकटातून कोण कसे आपणांस वाचविणार ? या एका प्रश्नाचे उत्तर कुणासच सापडत नव्हते !

आणि बोटीचा कप्तानच सुन्न होऊन गेला काही वेळ. थोड्याच अवधीत त्याने चटकन एक कागद जवळ ओढला. त्यावर पेन्सिलीने लिहिले, "बोटीवर आग भडकली आहे. संरक्षक बोटी कृपा करून त्वरित पाठवाव्यात." आणि बिनतारी संदेशद्वारा अशी मदत त्वरित मागविण्यात आली.

कप्तानाचा धीर मुळीच खचला नव्हता. शेजारी उभ्या असणाऱ्या आपल्या एका अधिकारी मित्रास तो म्हणाला, "सभोवती पुष्कळ बोटी समुद्रात उभ्या आहेत. आपल्याला मदत नक्की मिळेल. भिण्याचे एवढे कारण नाही. धोका बहुदा दूर होईल."



त्याने दूरवर नजर टाकली. पाचसहा बोटी त्याच्या दृष्टीच्या टप्प्यात होत्या. त्याच्या दुर्बिणीमधून त्याला त्याचा सुगावा लागला. आता आपला संदेश पोचून त्यांची मदत चटकन आपणास मिळेल, अशी त्याला खात्री होती. अरबी बंदरापासून आशिया बोट मैल-दीड मैल अंतरावर पेटून उभी होती. भोवती थोड्याफार अंतरावर काही ब्रिटिश, काही फ्रेंच बोटी उभ्या होत्या. अंधार पडत चालला असला तरी दूरच्या बोटींवरील माणसांची संरक्षण बोटी पाठविण्याची धावपळ कप्तानाला अस्पष्टपणे जाणवत होती. त्या संरक्षक बोटी 'एशिया' बोटीपर्यंत येण्याच्या अवधीत भडकणाऱ्या ज्वालांपासून उतारूंचे प्राण रक्षण

कसे करायचे ? त्यांची धांदल कशी थांबवायची ? त्यांचा आरडाओरडा कसा बंद करायचा ? त्यांच्या किंकाळ्या कशा थांबवायच्या ? ह्या प्रश्नांनी व्यग्र झालेल्या कप्तानाने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने आगीच्या ज्वाळा विझविण्याचा, कमी होण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही. आग आता कुणासही आवरेल अशी चिन्हे दिसत नव्हती. पाण्याचा मारा नीटपणे होण्यासारखा नव्हता. आग विझवणाऱ्या माणसांचे हात व चेहेरे चांगलेच होरपळून निघाल्यावर ते नाइलाजाने मागे फिरले.

बोटीचा कप्तान धीमेपणाने एकेक उपाय शोधीत होता. थोड्याफार अवस्थेत बचावलेल्या लाइफबोट्स वापरून पाहाव्यात काय ? एक धाडसी विचार त्याच्या मनात येऊन गेला. लगेच त्याने प्राणसंरक्षक बोट खाली पाण्याशी सोडण्याची आज्ञा दिली. आणि ती बोट सिद्ध होताच तिच्याकडे धावून जाणाऱ्या अरब यात्रेकरूंची एकच धांदल उडून गेली. जो तो आपणास पहिल्या बोटीत प्रवेश मिळावा यासाठी धडपड करू लागला. एक दुसऱ्यास मागे खेचीत होता. भांडणे वाढत होती. मारामारीवर प्रसंग आला.

बोटीच्या अधिकाऱ्यांनी ओरडून सांगितले, "घाई नका करू. प्रथम बायका आणि मुले जातील." पण हा हुकूम ऐकतो कोण ? प्रत्येकजण स्वतःचे प्राण वाचविण्यास तत्पर झालेला दिसला. पुरुष आणि स्त्रिया यांची झुंबड सुरू होती. धटिंगण पुढे सरसावत होते. दुर्बलांना धक्के खावे लागत होते. त्यातून कुणी पुढे संरक्षक बोटीकडे सरसावलाच तर मागचे त्याला खेचून मागे ओढीत होते.

"थांबा आता सर्वजण ! गोंधळ करू नका. आता बोटीत एकाही माणसास जागा नाही. कुणीही चढू नका आता बोटीत !"

कप्तानाच्या या हुकमाकडे ध्यान द्यायला भानावर कोण होते ? यात्रेकरूंची गडबड व दंगल थांबली नाही. लहानशा बोटीत खच्चून माणसे भरली गेली होती. ही तरी माणसे सुखरूपपणे किनाऱ्यावर जातील की नाही ? संरक्षक बोट हळूहळू पाण्याच्या पृष्ठभागावर आणण्यासाठी खाली आणली जात असतानाच जास्त ओझ्यामुळे फुटली ! आतील सर्व उतारू समुद्रात पडले. आगीत सापडून मरणारे समुद्रात मरायला टेकले. पुन: मुलांच्या, बायकांच्या किंकाळ्या ! समुद्रातून यांना कोण वाचविणार ? काही थोड्याच लोकांना पोहता येत होते; बाकीचे

समुद्राच्या तळाशी जाणार हे ठरलेले ! आणि संकटात भर अशी की, या समुद्रात भयानक व हिंस्त्र असे शार्क मासे भरपूर होते. त्यांनी उतारूंच्या शरीराचे लचके तोडायला आरंभ केला. माणसाच्या रक्ताची चटक शार्क माशांना भारी प्रिय. त्यांना या रात्री अनायासे भरपूर खाद्य मिळाले. वरती बोटीवर ज्वाळांच्या लाललाल रक्ताच्या लाटांत उतारूंना मोक्ष मिळत होता. 'एशिया' बोटीवरचा कप्तान हताश होऊन हे दृश्य पाहात होता. समुद्राच्या पाण्याची सळसळ, शार्क माशांची उसळी आणि उतारूंची भयानक किंकाळी यांच्या आवाजांनी त्याचेही कान बधिर होऊन गेले. समुद्राच्या तळाशी जाणाऱ्या उतारूंची अस्पष्ट होत जाणारी आर्त हाक त्याचे काळीज कापून जाई.

एवढ्या वेळेपर्यंत आसपासच्या जहाजांवरील प्राणसंरक्षक बोटी 'एशिया'च्या भोवती जमा झाल्या होत्या. अग्नी आणि शार्क मासे यांच्या तावडीतून सापडणाऱ्या यात्रेकरूंना वाचविण्याचा त्यांचा निष्फळ प्रयत्न सुरू झाला. त्यांनी काही बुडणाऱ्या प्रवाश्यांना जिवंतपणीच आपल्या बोटीवर घेतले. पण कुणाचा हात, कुणाचा पाय, कुणाचा कान शार्क माशांनी ओरबाडून नेलेला होता. कुणाला इतर दुखापत झाली होती. कुणी कण्हत होते, कुणी विव्हळत होते, कुणी अर्धमेल्या अवस्थेत होते !

दुसऱ्या काही संरक्षक बोटी उतारूंनी भरण्यात आल्या. आता मर्यादेपेक्षा जास्त उतारू बसणार नाहीत याची खबरदारी कप्तानाने घेतली. मूठभर सहकाऱ्यांनी कप्तानाचा हुकूम मानण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. पुन: यात्रेकरूंनी दंगल करून भराभरा संरक्षक बोटीत उड्या घेतल्या. पुढच्या माणसास मागे ओढण्यासाठी मागच्यांनी तीक्ष्ण धारेचे शस्त्रही वापरण्यास कमी केले नाही. घाईगर्दीत दुसरी बोट यात्रेकरूंनी गच्च भरून गेली. ती पाण्याच्या पृष्ठभागावर येत असताना पुन: पहिलाच प्रसंग घडला ! बोट फार मोठ्या भाराने कोलमडली. सारे उतारू समुद्रात पडले. काही गटांगळ्या खाऊ लागले, काही पोहू लागले, काही हिंस्त्र शार्कच्या तावडीत सापडून मुक्त झाले. पुन: भयानक आरडाओरडा ! भीतिदायक किंकाळ्या ! मक्केच्या या यात्रेकरूंना आता कोण वाचविणार ? आपापसात खून, मारामाऱ्या यांनाही ऊत आला. बायकांचे व मुलांचे हाल तर पुसूच नयेत.

उतारूंच्या दंगलीमुळे कोणतीच संरक्षक बोट धडपणे काम करू शकली नाही. 'एशिया' बोट आता काही वाचणार नाही; तिच्यावरील उतारूही बहुतेक सर्व मरणार, या जाणिवने बोटीचा कप्तान खिन्न झाला. सबंध बोटीभोवतीच ज्वाळा पसरत चालल्या होत्या. आसपासच्या संरक्षक बोटींचा फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता ! प्रवासी लोकांची गर्दी, धक्काबुक्की, दंगल वाढतच होती. बायकामुलांच्या करुण किंकाळ्यांनी आकाश भेदून गेले. ही माणसे जरा शांतपणे वागतील तर काही करता आले असते त्याला. पण ते शक्य नव्हते. मध्येच त्याला सुचले : 'हे असेच जळते जहाज किनाऱ्याकडे फिरविले तर ? काही थोडी माणसे वाचतील का ?' तो लगेच इंजिनरूमकडे गेला. इंजिन ठीक असल्याचा अंदाज त्याने घेतला. त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला मनापासून साथ दिली; आणि जळते जहाज किनाऱ्याकडे येण्यास निघाले ! त्याची गती संथ होती. भोवती समुद्रात संरक्षक बोटी हताशपणे उभ्या होत्या. मरण पावलेल्या उतारूंची संख्या मोठीच होणार असल्याचे कप्तानाच्या ध्यानात आले.

पण अशा प्रकारचे जहाज फार वेळ चालले नाही. थोड्याच वेळात त्यात काहीतरी बिघाड झाला, आणि त्याचा प्रवास थांबला. इतर बोटींवरील आणखी काही संरक्षक बोटी आता जमा झाल्या होत्या. किनाऱ्यावरून काही अरबी नावाडी आपल्या होड्यांतून मदतीस धावून आले होते. त्यांच्या होड्या फारच लहान होत्या. पर्शियन व तांबडा समुद्र यातील मोती वेचण्याचे काम त्यांनी आतापर्यंत केले होते. काळ्याभोर आकाशात तांबड्यालाल अग्नीच्या ज्वाळा 'एशिया' बोटीवरून पसरत असलेल्या पाहून त्यांचे नावाडी भयभीत झाले.

जळत्या बोटीवर आता काही थोडे कामगार व उतारू शिल्लक राहिले होते. कित्येकजण आगीत जळून मेले. कित्येकांनी समुद्रात उड्या घेतल्या. कित्येक दंगामस्ती करीत असताना मरण पावले. कित्येकांना शार्क माशांनी समुद्राच्या तळाशी नेले. जळत्या बोटीच्या उरलेल्या भागास दोर बांधून काही उतारू उतरण्याचा प्रयत्न करू लागले. तेथेही धावपळ व गर्दी झालीच; पण पूर्वीइतका गोंधळ झाला नाही. कारण आता माणसांची संख्या फारच थोडी होती ! सभोवतीच्या संरक्षक बोटींतील ब्रिटिश अधिकारी "शांत राहा. . . शांत राहा. . . तुम्ही सुखरूप उतराल. . . दंगा करू नका." असे ओरडून सांगत

होते. पण त्यांचे सांगणे कुणाच्या कानात शिरत नव्हते.

पुन: एकदा कप्तानाने शांत राहाण्यासाठी विनविले, थोडे रागावून पाहिले. उरलेल्या लोकांना प्राण वाचविण्याची ही शेवटची संधी असल्याचें सांगून पाहिले. पण काहीही उपयोग झाला नाही. माणसांची धांदल थांबेना. सामानसुमान वाचविण्याचीही इच्छा काहींना होती. कॉफीचे डबे, सूटकेसेस, कपड्यांची बोचकी समुद्रात, संरक्षक बोटीत फेकण्यास सुरुवात झाली. काही स्त्री-पुरुष दोरास धरून उतरले. काही समुद्रात पडले. पण थोड्याच वेळात 'एशिया'वरील उरलीसुरली माणसे कशीतरी बोटीच्या बाहेर पडली.

'एशिया' बोटीवरचा कप्तान प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता. सर्वजण बोट सोडून जातील तेव्हाच आपण जाऊ, असा त्याचा निश्चय होता. संकटकाळी माणसाच्या स्वभावाचे अनेक नमुने त्याने पाहिले. रेटारेटी, दंगामस्ती करणारे यात्रेकरू जसे त्याने पाहिले; तसेच अत्यंत शांतपणाने मक्केकडे तोंड करून, जमिनीवर वाकून येणाऱ्या संकटास धीराने तोंड देणारे अरबही त्याने पाहिले. ह्या थोड्या लोकांना भोवती पसरणाऱ्या आगीची चिंता जणू काहीच नव्हती. मृत्यू येण्यापूर्वी आपणास मक्केची यात्रा तर घडली; याच एका समाधानात ते होते. पांढरा स्वच्छ पोषाख व हिरवे शिरोभूषण या पवित्र यात्रेकरूंच्या वेषामधील हे निष्ठावान प्रवासी अत्यंत शांतपणे मृत्यूस भेटण्यासाठी सिद्ध झाले होते. संरक्षक बोटींकडे त्यांनी धाव घेतली नाही, की दंगामस्ती करण्याचे त्यांच्या मनातही आले नाही. मक्केच्या यात्रेमुळे ते जणू कृतकृत्य झाले होते. गुडघे टेकून त्यांनी प्रार्थना म्हटल्या. कुराणामधील पवित्र ओळी त्यांच्या मुखातून बाहेर पडल्या.

'या जगात एक अल्लाच श्रेष्ठ आहे. अल्लाशिवाय दुसरा देव जगात नाही. या अल्लाचा महंमद हा एक प्रेषित आहे'

अशा अर्थाच्या प्रार्थना करून, मृत्यूच्या समोर हे थोडे अरब लोक मोठ्या धैर्याने तयार असलेले कप्तानाने पाहिले ! त्यांच्या या निर्विकारतेने त्यालाही बळ आले.

ह्या संकटात सर्वच लोक बिथरून गेले होते असे नाही. चहू दिशांनी आगीचे लोळ उठत असताना, बोटीचा कप्तान मोठ्या शांत व उत्साही वृत्तीने

उतारूंच्या प्राणाची काळजी वाहात असल्याचे दृश्य पाहून काही अरब तरुणांनीही त्याला खूपच मदत केली.

अबदुल मलिक या तरुणाने स्वत:च्या प्राणाची पर्वा न करतां अनेक सहप्रवासी स्त्री-पुरुषांचे प्राण वाचविले. भोवती धुरांचे, ज्वाळांचे लोट उसळत आहेत, लोक भीतीने चीत्कारत आहेत, अशा वेळी अबदुल विजेसारखा तळपून लोकांना मदत करू लागला. कित्येक यात्रेकरूंना स्वत: होऊन संरक्षक बोटीत उडी टाकण्याची भीती वाटू लागली. अशा वेळी अबदुल पुढे यायचा, कुणाचा हात धरायचा, कुणा म्हाताऱ्या माणसास वा मुलास पाठीशी घेऊन मोठ्या धीराने संरक्षक बोटीत नेऊन पोचवायचा. बायका, मुले, वृद्ध यांना या शूर माणसाने स्वत:च्या संरक्षणाची काळजी न करता वाचविले. त्याने स्वत: एका प्राणसंरक्षक बोटीचा ताबा घेतला व अखंडपणे मदतीचे काम चालू केले. त्याने अलौकिक धैर्य व सामर्थ्य दाखवून शंभराच्यावर उतारूंना किनाऱ्यावर सुखरूपपणे आणून सोडले. चौथ्या खेपेस तर मलिकने कमालच केली ! एका म्हाताऱ्या माणसाला वाचविण्यासाठी तो ज्वाळांच्या मिठीतच शिरला. त्याने त्या म्हाताऱ्या माणसास खांद्यावर घेतले, आणि तो परत निघाला . . . . तोच त्याच्या अंगावर बोटीचा जळणारा भाग कोसळला व म्हाताऱ्या माणसासकट तो खाली समुद्रात कोसळला. एका भयानक किंकाळीने सारे वातावरण थरारून गेले !

असे नमुने पाहून बोटीच्या कप्तानासही धन्यता वाटली. अब्दुल मलिकच्या धैर्याची कथा तो पुढे कित्येक दिवस सांगत होता. 'एशिया' बोटीवरील बहुतेक उतारू या नाही त्या मार्गाने गेल्यावर, कप्तान आपल्या सहकाऱ्यांना गहिवरून म्हणाला, "मित्रांनो, खूप काम केलंत तुम्ही ! फार फार आभारी आहे मी तुमचा. आता तुम्ही तुमचे प्राण कसेही करून वाचवा. सर्वांनी शिस्तीत ओळ करून दोर धरा !"

एकामागून एक असे संरक्षक बोटीत उतरले, काही पोहणारे होते, त्यांनी समुद्रात उड्या घेतल्या. कित्येकांची अंगे भाजली होती. कित्येकांना जखमा झाल्या होत्या. सर्व सहकारी निघून गेल्यावर त्या जळक्या बोटीवर उभा होता फक्त कप्तान ! एकटा कप्तान ! !

त्याच्या आसपास आता कोणीही नव्हते. त्याने घड्याळात पाहिले. मध्यरात्र उलटून गेली होती. भयानक अग्नीशी चारपाच तास त्याने सहकाऱ्यांबरोबर झुंज दिली होती. त्याने माणसांच्या भयानक किंकाळ्या ऐकल्या. भीतीने बेभान झालेली माणसे पाहिली. स्वार्थाने पशू बनलेली माणसे त्याच्यासमोर लज्जास्पद वर्तन करीत होती; आणि जन्मभर ध्यानात राहील अशी काही धैर्याची व उदात्त वर्तनाची दृश्येही त्याला दिसली. कप्तानाचे काम आता संपले होते. आपल्या सर्व सहकाऱ्यांनाही त्याने मुक्तपणे प्राण-रक्षणाची मुभा दिली होती. उतारू वाचू शकले नाहीत, याची फार मोठी खंत त्याच्या मनात होती.

ह्या जळून गेलेल्या बोटीस सोडणे त्याच्या जिवावर आले ! पण काही इलाजच नव्हता. मोठ्या कष्टाने त्याने 'एशिया'चा निरोप घ्यायचा ठरविले. धुरातून, राखेतून, ज्वाळांतून बाहेर पडता पडता, त्याला भयानक दिव्यातून जावे लागलेच. त्याचे अंग ठिकठिकाणी भाजून निघाले. त्याच्या कातडीवर चांगलेच फोड टरारून वर आले. धुराने व उष्णतेने त्याचे डोळे आंधळे बनल्यासारखे झाले. एका ब्रिटिश बोटीच्या संरक्षक बोटीने त्याला अलगदपणे आसरा दिला. बोटीत बसल्यावर त्याने हताशपणे आपल्या जळक्या बोटीकडे पाहिले. आता त्याच्या बोटीत काही म्हणून उरले नव्हते. सबंध बोट अग्नीच्या मुखात समर्पित झाल्याचे दु:खद दृश्य त्याला दिसले.

किनाऱ्यावर परत येताना त्याचे अंत:करण जड झाले होते. अजूनही त्याच्या भोवती काही संरक्षक बोटी समुद्रात उतारूंचा शोध घेत होत्या. शार्कच्या तावडीतून अर्धवट सापडलेल्या माणसांची व्यवस्था लावीत असल्याचे त्याला दिसले. पोहण्याची व्यर्थ धडपड करणाऱ्यांना मदत देणाऱ्या बोटींची व त्यावरील माणसांची त्याला करुणा आली. 'आपण आणखी काय करू शकू ?' असाही प्रश्न त्याच्या मानत चमकून गेला.

तो त्याच्या कानात दीर्घ स्वरातील किंकाळ्या आल्या. पुन: आता हा काय चमत्कार ! हे कुठले नवे संकट ? त्याने मागे पाहिले. किंकाळ्या 'एशिया' बोटीवरूनच येत होत्या. बोटीवरील सर्व उतारू उतरले होते ना ? त्याच्या ध्यानात सर्व काही आले— काही अरब अजूनही नजर चुकवून जळणाऱ्या बोटीवरच अडकले होते ! त्यांचा हा आरडाओरडा होता. एक ब्रिटिश संरक्षक

बोट त्यांच्या मदतीस होती. 'तुम्ही पाण्यात उड्या टाका ना लौकर' असे त्यावरील अधिकारी जळणाऱ्या बोटीवरील उतारूंना सांगत होते. आता अवधी होता कुठे ? सारेच संपणार होते ! पण त्यांचे म्हणणे अरब उतारूंना नीटपणे समजेना. काहींना उड्या टाकण्याची भीती वाटत होती. मग ती ब्रिटिश संरक्षक बोटच धीराने 'एशिया' बोटीपाशी गेली. दोर टाकले गेले. दोरावरून अरबांनी उतरावे म्हणून सूचना झाल्या. पण ते भीतिग्रस्त अरब काहीच करीत नव्हते. मग संरक्षक बोटीवरील एका अधिकाऱ्याने दोराला धरून प्रत्येकास वाचविले जळणाऱ्या बोटीवरील शेवटचा मनुष्य संरक्षक बोटात उतरला. आता तरी कुणी उरले नाही ना, अशी खात्री करून घेऊन हा ब्रिटिश अधिकारी मग परत फिरला !

आता मात्र 'एशिया' एकटी, अगदी एकटीच उरली. अग्नीने तिला पूर्णपणे ग्रासून टाकले. सूर्य उगवून आला तरी 'एशिया' धुमसतच होती ! धुराचे लोट उसळत होते ! ज्वाळा आणि ठिणग्या मधून मधून फुत्कारत होत्या ! दोनतीन दिवस हे धुमसणे चालू होते !

उरलेसुरले यात्रेकरू व अधिकारी किनाऱ्यावर आल्यावर थोडी विश्रांती सर्वांनी घेतली. बंदरावरील पोलिस एव्हाना मदतीस आले होते. कप्तानाने जळत्या बोटीमधून येताना आठवणीने कागदपत्र बरोबर आणले होते. पोलिसांच्या मदतीने उतारूंची उपस्थिती घेण्यासाठी कप्तान सिद्ध झाला. प्रत्येकाचे नाव उच्चारले जात होते. जो उच्चारास साथ देईल त्याच्या नावापुढे उपस्थितीची खूण केली जात होती. उपस्थिती घेण्याचे काम संपल्यावर अशा खुणा मोजण्यात आल्या, त्या अवघ्या ११२ भरल्या ! आणि बोटीवर दीड हजार यात्रेकरू होते ? अर्थात उरलेल्यांना समुद्राच्या पोटात, शार्कच्या पोटात, अग्नीच्या पोटात स्थान मिळाले हे नक्की झाले !

कोण कसे मेले याची चर्चा सुरू झाली, तेव्हा एक भयंकर हकीकत बाहेर आली. जेव्हा आग भडकली तेव्हा खालच्या डेकवरील पन्नास स्त्री-पुरुष एकदम धावतपळत वरच्या डेकवर आले ! त्यांना उष्णता भाजून काढीत होती. धुराने त्यांचे प्राण कासावीस झाले होते. त्यांची सुटका आता होणे कठिण होते. त्यांच्या मनावर पूर्वेकडील संस्कार असल्यामुळे त्यांना मरणाचे भय नव्हते

अग्नीत मरण्यापेक्षा काही अलौकिक करून हौतात्म्य पत्करण्याची त्यांना इच्छा झाली. प्रत्येकाने आपल्या जवळची सुरी काढली व ती आपल्याच मानेवर फिरवून अल्लाचे नाव घेत घेत प्राण सोडला ! काही यात्रेकरूंनी भोजनगृहात धाव घेतली व त्यांनी मक्केकडे तोंड करून प्राण सोडले ! काहींच्या मुखांतून प्रार्थनेचे अखेरचे शब्द बाहेर पडले !

अशा अनेक कथा 'एशिया' बोटीवरील अग्निप्रलयाच्या नंतर कित्येक दिवस लोकांच्या चर्चेत येत राहिल्या ! एका फ्रेंच बोटीमधून कप्तान मार्सेलिसला निघाला. तेव्हा तो म्हणाला, "तेहतीस वर्षांच्या सागरी आयुष्यात असा भीषण प्रसंग मी कधीच पाहिला नाही ! परमेश्वराचे केवढे आभार मानावेत ? हीच आग समुद्राच्या मध्यावर लागली असती तर... एकही मनुष्य वाचला नसता ! काय झाले ते सांगायलाही कुणी उरला नसता."

■ ■ ■

# ६ : एका झेपेत न्यूयॉर्क ते पॅरिस

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सन १९२७ सालची हकीकत आहे ही !

त्या वेळी आजच्यासारखी कसल्याही प्रकारची दणकून भली मोठी जाहिरात करण्याची पद्धत नव्हती. वाटेल त्या माणसाचा गौरव करण्यासाठी लोक उत्सुक नसत. अल्प गुणांचा पर्वत करून उदोउदो करण्याची चाल त्या वेळी नव्हती. अशा काळात, पंचवीस वर्षाच्या एका साहसी तरुणाचे नाव साऱ्या जगात एकदम प्रसिद्ध झाले ! साऱ्या अमेरिका राष्ट्राने या तरुण माणसास डोक्यावर घेतले. राष्ट्राध्यक्ष कॉलिज यांनी अमेरिकन आरमाराचे एक खास जहाज या राष्ट्रपुत्रास पॅरिसहून परत मायदेशी आणण्यासाठी धाडले. आणि तो अमेरिकेत येण्याच्या सुमारास एका रविवारच्या वृत्तपत्राने या तरुण माणसाबद्दल किती कॉलम मजकूर लिहावा ? — दोन ? चार ? दहा ? — शंभर कॉलम्सनी मजकूर गच्च भरला होता; तरी या तरुणाचे कौतुक अपुरेच राहिले ! या साहसी वीरास अभिनंदनांच्या तारा त्या काळात किती याव्यात ? ५५००० तारांचा वर्षाव या धैर्यवान युवकावर झाला ! या तारांमधील एका तारेवर सह्या होत्या १७,५०० लोकांच्या ! ५२० फूट लांबीची ही अभिनंदनाची तार होती !

न्यूयॉर्कच्या रस्त्यांतून अभूतपूर्व असे स्वागत या वीराचे झाले. हजारो नागरिकांनी रंगीत कागदांच्या फुलांचा वर्षाव त्याच्यावर केला. दुसऱ्या दिवशी त्या सबंध रस्त्यावर १८०० टन कागदांचा चुरा सफाई करणाऱ्यांना उचलावा लागला.

हा कोण तरुण होता ? कशासाठी लोक त्याच्यावर एवढे लुब्ध झाले

होते ? तो राजकीय पुरुष नव्हता, क्रांतिवीर नव्हता, नट नव्हता, विनोदी वक्ता नव्हता, एखादा देखणा राजपुत्र नव्हता, एखादा साधुसंत नव्हता, स्वातंत्र्यवीर नव्हता — तो एक साधा वैमानिक होता ! त्याच्या लहानशा मनात आभाळाएवढे स्वप्न लहानपणापासून फुलत होते. विमानांचे बिनधोक प्रवास नुकतेच सुरू झाले होते. काही नवे उच्चांक स्थापन होत होते. परंतु एक प्रश्न तसाच मख्खपणे, एखाद्या अडदांड पर्वतासारखा उभा होता. अटलांटिक महासागर एकाच झेपेत, मध्ये कुठेही न थांबता अद्याप कुणी ओलांडला नव्हता. बोइंग जेटने आज आपण अटलांटिक ३-४ तासात, किंवा याहीपेक्षा कमी वेळात ओलांडू शकू. पण सन १९२५-३६ मध्ये एका झेपेत अटलांटिक समुद्र ओलांडणे ही अशक्यप्राय गोष्ट होती. अशक्य मानली जात होती.

तरी काही तरुणांची मने उंच भरारी मारण्यास उत्सुक होती. सूर्यबिंबास ग्रासणाऱ्या हनुमंताच्या यशाच्या वाटेकऱ्यांचेच हे भाऊबंद असावेत ! विमानातून एका झेपेत, मध्ये कुठेच न थांबता प्रवास करणाऱ्या साहसी वीरास न्यूयॉर्कच्या रेमन ऑर्टेग या धनिक व्यापाऱ्याने २५, ००० डॉलर्सचे बक्षिस लावले होते. पण हे बक्षीस केवळ निमित्त होते. आतापर्यंत कुणी केलेच नाही ते करण्याची जिद्द हीच प्रमुखपणे उत्तेजित करणारी होती. बक्षीस जाहीर झाल्यापासून पाचसहा वर्षे काही थोडेफार प्रयत्न अनेकांनी केले. कुणासही फारसे यश आले नाही. कुणाची विमाने मोडली, कुणी घरच्या मायेत गुरफटले; कुणी ऐन वेळी हवा प्रतिकूल म्हणून बेत रद्द केला. ननगेसर व फ्रान्सिस्को कॉली या साहसी वीरांनी आपल्या व्हाइटबर्ड या विमानातून फ्रान्सच्या किनाऱ्यावरून पश्चिमेकडे अटलांटिकवर झेप घेतली ! ही माणसे न्यूयॉर्कला केव्हा पोचणार ? लोक यशाच्या बातमीची वाट पाहात होते; पण ही बातमी कधीच कुणी ऐकली नाही. या दोन वीरांना घेऊन व्हाइटबर्ड मध्येच कुठेतरी अटलांटिकमध्ये गडप झाले होते !

यानंतर १५-२० दिवसांत अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्यावरून एक वेडा मनुष्य हे अचाट साहस करून मृत्यूच्या दरीत स्वतःस लोटून देण्यास उत्सुक झाला होता ! शिकॅगो ते सेंट लुई या मार्गावर, विमानातून टपालाची ने-आण करणाऱ्या या तरुण माणसास अटलांटिक पार करण्याची कल्पना रुचली. अनेक आपत्तींना

तोंड देऊन सेंट लुईच्या धनिकांच्या मदतीने त्याने स्वतःचे एक विमान तयार करून घेतले.

या विमानाचे नाव होते स्पिरिट ऑफ् सेंट लुई. वैमानिकाचे नाव चार्ल्स लिंडबर्ग.

चार्ल्स लिंडबर्गचे वडील एक मोठे उद्योगी गृहस्थ होते. वकिलीच्या व्यवसायात ह्यांनी चांगला पैसा मिळविला. शेतजमीन मोठ्या प्रमाणावर घेतली. बँकेचे डायरेक्टरही ते होते. त्यांची पहिली बायको त्यांना तीन मुलींची देणगी देऊन तरुण वयातच मरण पावली ! पुढे मिनिसोटा राज्यामधील लिटिल फॉल्स येथील एका हायस्कूलमध्ये शास्त्र विषय शिकविणाऱ्या एका मुलीशी त्यांनी पुन: लग्न केले.

त्यांना ४ फेब्रुवारी १९०२ या दिवशी एक मुलगा झाला. त्याचे नाव चार्ल्स ठेविले. लहानपणी बापाबरोबर हा अनेक ठिकाणी हिंडला. बापाची मोटार हाच चपळाईने चालवीत असे. अनेक अपघात, अनेक संकटे यांचे शिक्षण त्याने याच सुमारास घेतले. तसे पाहिले तर चार्ल्स लिंडबर्ग हा भित्रा, संकोची, न बोलणारा मुलगा लोकांना वाटे. त्याची उंची चांगली सहा फूट तीन इंच होती ! वयात येणाऱ्या माणसाचे कोणतेच चाळे त्याला माहीत नव्हते. मुलींच्या पाठीमागे हिंडण्यात त्याला स्वारस्य नव्हते. त्याला सिगारेट ओढण्याचा नाद नव्हता. त्याला मद्याचाही सराव नव्हता. तो लोकांच्या ध्यानात येई ते केवळ त्याच्या बेफामपणे धावणाऱ्या मोटारसायकलमुळे. विमान-विद्येचेही शिक्षण त्याने थोडेफार घेतले होते.

पुढे शिकॅगो-सेंट लुई या मार्गावरील टपालाची ने-आण करूनही त्याला भरपूर वेळ उरलेला दिसे. या रिकाम्या वेळात त्याचे मस्तक विचारांनी भरारून जाई. पॅरिस ते न्यूयॉर्क अथवा न्यूयॉर्क ते पॅरिस – हे अंतर एका झेपेत कुठेही न थांबता, हवेपेक्षा जड विमानाने जो तोडील, त्यास २५००० डॉलर्सचे बक्षीस मिळणार असल्याचे जाहीर झाल्यापासून त्याचे बाहू स्फुरण पावत होते. आपण हे साहस का करू नये ? पैशासाठी नव्हे; पण कुणी आजवर केले नाही म्हणून यासाठी साहस म्हणून, या विलक्षण व धाडशी प्रयोगात आपण लक्ष घालावे का ? आपणांस हवे तसे विमान मिळेल ? आपला प्रयत्न यशस्वी होईल ?

यापूर्वीच्या लोकांप्रमाणे अपयश आले तर? मरण आले तर? सन १९१९ मध्ये न्यू फाऊंडलंड ते आयर्लंडपर्यंतचे १९६० मैलांचे अंतर ऑलकॉक व ब्राऊन यांनी तोडले होते. पण आता न्यूयॉर्क ते पॅरिस हे अंतर ३६१० मैलांचे होते. जवळ जवळ दुप्पट मैलांचा हा प्रवास एकाच झेपेत करणे वेडेपणाचे तर नाही? उगाच आयुष्य धोक्यात कशाला घालावे? अशा उलटसुलट व निराशाजनक विचारांतून त्याने मार्ग काढला.

लिंडबर्गने प्रथम विमान मिळविण्याचा प्रयत्न केला. चांगल्या चांगल्या कंपन्यांनी त्याला वेड्यातच काढले. त्याची कल्पना हास्यास्पद ठरविली. या अपेशी होणाऱ्या व प्रसंगी प्राण गमावणाऱ्या माणसास विमान देऊन, स्वत:च्या कंपनीचा लौकिक खराब करण्यास कुणीही तयार होईना. पैसे वाटेल तसे मिळतील; पण अपेशामुळे कंपनीच्या नावाची पत जाईल त्याचे काय? शेवटी एका विमान कंपनीने चार हजार मैल जाऊ शकणारे, एका इंजिनचे कमीत कमी यंत्रसामग्रीचे, रेडिओ नसलेले विमान तयार करून देण्याचे कबूल केले. सेंट लुईच्या श्रीमंतांनी पैशाची मदत केली. लिंडबर्गची उत्सुकता व धैर्यवृत्ती वाढत होती. सभोवतालच्या बातम्या फारशा अनुकूल नव्हत्या. अपघाताच्या बातम्या वारंवार येत. डेव्हिस व वूस्टर यांचे विमान न्यूयॉर्कशेजारीच कोसळून ते दोघे नुकतेच ठार झाले होते. फ्रान्सचा ननगेसर समुद्रातच नाहीसा झाल्यावर ही रानटी स्पर्धा बंद करावी असे जाणते म्हणत होते.

अशा पार्श्वभूमीवर २० मे, १९२७ या दिवशी न्यूयॉर्कच्या किनाऱ्यावर चार्ल्स लिंडबर्गचे विमान 'स्पिरिट ऑफ सेंट लुई' अटलांटिक प्रवासास सिद्ध झाले होते. रुझवेल्ट विमानतळावर मोजकीच माणसे लिंडबर्गला निरोप द्यायला उपस्थित असली तरी साऱ्या अमेरिकनांचे लक्ष लिंडबर्गच्या या साहसावर खिळून होते. न्यूफाऊंडलंड, आयर्लंड, इंग्लंड, ब्रिटिश खाडी, फ्रान्स असा हा प्रवास होता. या अद्‌भुत व रोमांचकारी प्रवासास साहसी लिंडबर्ग आतुर होता. विमानांची, आतील यंत्रसामग्रीची तपासणी पुन: पुन्हा होत होती. कुठे काही बिघाड होता कामा नये; अंतर फार मोठे होते. धोक्याची शक्यता पदोपदी होती, म्हणून काळजी व तपासणी प्रत्येक क्षणी अत्यावश्यक वाटली.

विमानाची सर्व तपासणी पूर्ण होऊन ते उड्डाणास सिद्ध झाले. पण मध्येच

तोंड देऊन सेंट लुईच्या धनिकांच्या मदतीने त्याने स्वतःचे एक विमान तयार करून घेतले.

या विमानाचे नाव होते स्पिरिट ऑफ् सेंट लुई. वैमानिकाचे नाव चार्ल्स लिंडबर्ग.

चार्ल्स लिंडबर्गचे वडील एक मोठे उद्योगी गृहस्थ होते. वकिलीच्या व्यवसायात ह्यांनी चांगला पैसा मिळविला. शेतजमीन मोठ्या प्रमाणावर घेतली. बँकेचे डायरेक्टरही ते होते. त्यांची पहिली बायको त्यांना तीन मुलींची देणगी देऊन तरुण वयातच मरण पावली ! पुढे मिनिसोटा राज्यामधील लिटिल फॉल्स येथील एका हायस्कूलमध्ये शास्त्र विषय शिकविणाऱ्या एका मुलीशी त्यांनी पुनः लग्न केले.

त्यांना ४ फेब्रुवारी १९०२ या दिवशी एक मुलगा झाला. त्याचे नाव चार्ल्स ठेविले. लहानपणी बापाबरोबर हा अनेक ठिकाणी हिंडला. बापाची मोटार हाच चपळाईने चालवीत असे. अनेक अपघात, अनेक संकटे यांचे शिक्षण त्याने याच सुमारास घेतले. तसे पाहिले तर चार्ल्स लिंडबर्ग हा भित्रा, संकोची, न बोलणारा मुलगा लोकांना वाटे. त्याची उंची चांगली सहा फूट तीन इंच होती ! वयात येणाऱ्या माणसाचे कोणतेच चाळे त्याला माहीत नव्हते. मुलींच्या पाठीमागे हिंडण्यात त्याला स्वारस्य नव्हते. त्याला सिगारेट ओढण्याचा नाद नव्हता. त्याला मद्याचाही सराव नव्हता. तो लोकांच्या ध्यानात येई ते केवळ त्याच्या बेफामपणे धावणाऱ्या मोटारसायकलमुळे. विमान-विद्येचेही शिक्षण त्याने थोडेफार घेतले होते.

पुढे शिकॅगो-सेंट लुई या मार्गावरील टपालाची ने-आण करूनही त्याला भरपूर वेळ उरलेला दिसे. या रिकाम्या वेळात त्याचे मस्तक विचारांनी भारून जाई. पॅरिस ते न्यूयॉर्क अथवा न्यूयॉर्क ते पॅरिस — हे अंतर एका झेपेत कुठेही न थांबता, हवेपेक्षा जड विमानाने जो तोडील, त्यास २५००० डॉलर्सचे बक्षीस मिळणार असल्याचे जाहीर झाल्यापासून त्याचे बाहू स्फुरण पावत होते. आपण हे साहस का करू नये ? पैशासाठी नव्हे; पण कुणी आजवर केले नाही म्हणून यासाठी साहस म्हणून, या विलक्षण व धाडशी प्रयोगात आपण लक्ष घालावे का ? आपणांस हवे तसे विमान मिळेल ? आपला प्रयत्न यशस्वी होईल ?

यापूर्वीच्या लोकांप्रमाणे अपयश आले तर? मरण आले तर? सन १९१९ मध्ये न्यू फाऊंडलंड ते आयर्लंडपर्यंतचे १९६० मैलांचे अंतर ऑलकॉक व ब्राऊन यांनी तोडले होते. पण आता न्यूयॉर्क ते पॅरिस हे अंतर ३६१० मैलांचे होते. जवळ जवळ दुप्पट मैलांचा हा प्रवास एकाच झेपेत करणे वेडेपणाचे तर नाही? उगाच आयुष्य धोक्यात कशाला घालावे? अशा उलटसुलट व निराशाजनक विचारांतून त्याने मार्ग काढला.

लिंडबर्गने प्रथम विमान मिळविण्याचा प्रयत्न केला. चांगल्या चांगल्या कंपन्यांनी त्याला वेड्यातच काढले. त्याची कल्पना हास्यास्पद ठरविली. या अपेशी होणाऱ्या व प्रसंगी प्राण गमावणाऱ्या माणसास विमान देऊन, स्वतःच्या कंपनीचा लौकिक खराब करण्यास कुणीही तयार होईना. पैसे वाटेल तसे मिळतील; पण अपेशामुळे कंपनीच्या नावाची पत जाईल त्याचे काय? शेवटी एका विमान कंपनीने चार हजार मैल जाऊ शकणारे, एका इंजिनचे कमीत कमी यंत्रसामग्रीचे, रेडिओ नसलेले विमान तयार करून देण्याचे कबूल केले. सेंट लुईच्या श्रीमंतांनी पैशाची मदत केली. लिंडबर्गची उत्सुकता व धैर्यवृत्ती वाढत होती. सभोवतालच्या बातम्या फारशा अनुकूल नव्हत्या. अपघाताच्या बातम्या वारंवार येत. डेव्हिस व वूस्टर यांचे विमान न्यूयॉर्कशेजारीच कोसळून ते दोघे नुकतेच ठार झाले होते. फ्रान्सचा ननगेसर समुद्रातच नाहीसा झाल्यावर ही रानटी स्पर्धा बंद करावी असे जाणते म्हणत होते.

अशा पार्श्वभूमीवर २० मे, १९२७ या दिवशी न्यूयॉर्कच्या किनाऱ्यावर चार्ल्स लिंडबर्गचे विमान 'स्पिरिट ऑफ सेंट लुई' अटलांटिक प्रवासास सिद्ध झाले होते. रुझवेल्ट विमानतळावर मोजकीच माणसे लिंडबर्गला निरोप द्यायला उपस्थित असली तरी साऱ्या अमेरिकनांचे लक्ष लिंडबर्गच्या या साहसावर खिळून होते. न्यूफाऊंडलंड, आयर्लंड, इंग्लंड, ब्रिटिश खाडी, फ्रान्स असा हा प्रवास होता. या अद्‌भुत व रोमांचकारी प्रवासास साहसी लिंडबर्ग आतुर होता. विमानांची, आतील यंत्रसामग्रीची तपासणी पुनः पुन्हा होत होती. कुठे काही बिघाड होता कामा नये; अंतर फार मोठे होते. धोक्याची शक्यता पदोपदी होती, म्हणून काळजी व तपासणी प्रत्येक क्षणी अत्यावश्यक वाटली.

विमानाची सर्व तपासणी पूर्ण होऊन ते उड्डाणास सिद्ध झाले. पण मध्येच

एक नसतीच अडचण आली. न्यूफाऊंडलंड, नोव्हॅस्कॉशिया, उत्तर अटलांटिक हे विभाग घनदाट धुक्याने धोकादायक झाल्याची सूचना हवामानखात्याकडून आली. आदल्या दिवसापासूनच सर्वत्र पाऊस थोडाथोडा झाला होता. भोवतीचे हवामान प्रतिकूल बनत होते. पण ही प्रतिकूल स्थिती फार काळ टिकली नाही, हवामान चांगलेच निवळले. आता प्रयाणास उशीर नको म्हणून विमानतळावर एकच धांदल झाली. प्रत्यक्ष उड्डाणापूर्वी चांगली विश्रांती घ्यावी म्हणून लिंडबर्ग एका हॉटेलमध्ये निघाला; पण इतर कामे भरपूर असल्यामुळे त्याला चांगली झोपही मिळू शकली नाही. २० मेच्या पहाटेसच तो विमानतळावर आला. पावसाची झिमझिम चालूच होती. मित्रांचे, नातेवाईकांचे निरोप घेणे हे काम फारसे नसले तरी महत्त्वाचे होते. या प्रवासातून लिंडबर्ग परत येईल अशी खात्री कुणासच नव्हती. कारण ह्यापूर्वी सर्वजण अपयशी ठरले होते.

सर्व व्यवस्थित झाल्यावर सकाळी ७-४० वाजता विमानाची यंत्रणा सुरू झाली. ७-५२ ला विमानाने पॅरिससाठी अमेरिकन भूमी सोडली. पावसामुळे जमीन ओलसर झाली असल्याने प्रथम उड्डाणास गती आली नाही. झाडेझुडपे आणि टेकड्या टाळीत विमान संथ गतीने निघाले. विमानाचा रोख प्रथम उत्तरेकडे नोव्हॅस्कॉशियाकडे होता. हवा मोठी छान होती. विमान फार उंचीवरून जात नव्हते. कधी कधी तर झाडांपासून वा पाण्यापासून दहा ते पंधरा फुटांचेच अंतर राही. केपकॉर्ड व नोव्हॅस्कॉशियामधील तीनशे मैलांचे अंतर तोडताना लिंडबर्गला खाली समुद्रात अनेक मच्छीमारी बोटी दिसल्या होत्या. धुके, ढग, थोडे वादळ यांचे अडथळे अजून तरी म्हणावेसे नव्हते. विमान जसजसे उत्तरेकडे जाई, तसतशी बर्फाळ हवा वाढत होती. खाली बर्फाचे शुभ्र आच्छादन नजरेत भरत होते. नोव्हॅस्कॉशिया, न्यू फाऊंडलंडवरून स्पिरिट ऑफ सेंट लुईची दिशा सेंट जॉन्स बेटांकडे वळली. समुद्रातील हिमपर्वतांचे दृश्य मोठे मनोहर दिसत होते. बारकी बारकी जहाजे आता फारशी नजरेत येत नव्हती.

रात्रीच्या सुमारास धुक्याचे आवरण दाट झाले. मग त्यावरून प्रवास करणे भाग पडले. काही काही ठिकाणी तर लिंडबर्गला दहा हजार फुटांच्यावर विमान न्यावे लागले. मग मात्र डोक्यावरल्या चांदण्या दिसत असत. चंद्र उगवायला अजून अवकाश होता. मध्येच धुक्याची किंवा ढगाची घनता वाढे. विमानास

हेलकावे बसत. लिंडबर्गला मार्ग थोडा बदलावा लागे. दोन तासांनंतर क्षितिजावर चंद्राचे दर्शन झाले. अशा या एकान्ताच्या व थोड्या भीतिदायक काळात चंद्राची सोबत लिंडबर्गला मोठी सुखद वाटली. मग प्रवास थोडा बिनधोक वाटला. रात्र कशीबशी संथपणे निभावली. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २१ रोजी हवा स्वच्छ होती. एखादा ढग अथवा धुक्याचा पट्टा असला तरी तो त्रासदायक वाटत नव्हता. सूर्य डोक्यावर येऊ लागल्यावर धुक्याचा भर आणखी कमी झाला. लिंडबर्ग आता समुद्राच्या सपाटीवर फक्त शंभर-सव्वाशे फुटांवरूनच प्रवास करीत होता. वायव्येकडून वादळ येण्याची चिन्हे दिसत होती. कारण समुद्राच्या उसाळ्या वाढीस लागल्या होत्या. पुढे धुक्याचा जोर एकाएकी वाढला. पंधराशे फूट उंचीवरून सुमारे दोन तास मोठ्या संकटातच गेले. विमानाची चढउतार एकदम होत असल्याने धोका वाढू लागला. जवळपास जमिनीचे दर्शन नाही ! वर अथांगपणे पसरलेले आकाश, खाली त्याच्याशी स्पर्धा करणारे पाणी, मध्ये चिमुकले स्पिरिट ऑफ सेंट लुई नावाचे विमान व त्यातील धैर्यवान वैमानिक चार्ल्स लिंडबर्ग ! धुक्याचा जोर कमी झाला की विमान पाण्याच्या पृष्ठभागावर शंभर ते दोनशे फुटांवरूनच जात असे. या अंतरावर विमान संथपणे व निर्भयपणे प्रवास करते असा त्याचा अनुभव होता. शिवाय पाण्यावरील लाटांच्या खळबळीवरून वाऱ्याची दिशा समजण्यासाठी मदत होते. काही पक्षी, काही सागरी प्राणी यांचे दर्शन मधून मधून होई; पण जहाजे दिसत नव्हती.

युरोपचा किनारा जवळ केव्हा येईल ? अखंड सावधपणा, झोपेची कमतरता, न्याहरी नीट न झालेली; अशा परिस्थितीत लिंडबर्गचे डोळे चुरचुरत होते; पण आता विश्रांती एवढ्यातच कुठली ? जमिनीच्या खुणा शोधणे एवढेच फार तर त्याला करता आले असते. प्रवास सुरू होऊन दहा तास झाले. . . पंधरा झाले. . . वीस झाले. . . तेवीस झाले; पण आयर्लंडचा किनारा आल्याच्या खुणा त्याला काही दिसत नव्हत्या ! मध्येच समोरून येत असलेल्या काही मासेमारी बोटी त्याला दिसल्या. किनारा जवळपासच असल्याची ही खूण होती. पुढे काही मैल जाताच बोटींची संख्या आणखी वाढली. लिंडबर्गच्या मनास धीर आला. संकटाचा मोठा भाग टळला असल्याचे त्याच्या ध्यानात आले.

त्याने एका बोटीस फेरी घातली; पण त्याला कुणाही माणसाचा सुगावा लागला नाही. पुन: त्याने आणखी बोटींभोवती फिरून पाहिले. तेव्हा त्यावर माणसांची चाहूल असल्याचे त्याला समजले. विमान शक्य तितके जवळ आणून तो विचारी, "का हो ? आयर्लंडचा किनारा किती दूर ?" पण त्याला उत्तरच मिळत नसे. कदाचित त्याची भाषा बोटीतल्या माणसांना समजत नसावी. मग नाइलाज होऊन तो परत तसाच पुढे निघाला. एक तासाने डोंगराळ भागाची किनारपट्टी त्याला दिसू लागली. लिंडबर्गचे विमान ह्यावेळी दोनशे फूट उंचीवर होते. त्यामुळे आठदहा मैल दूर असणारा किनारा त्याला स्पष्ट दिसत होता !

लिंडबर्गने जाणून घेतले की हेच आयर्लंड-केप व्हॅलेंटिना, डिंगल उपसागर यांची खात्री करून घेऊन लिंडबर्गने आपली दिशा पॅरिसकडे वळवली. आता त्याला असंख्य जहाजे पाण्यावरून ये-जा करताना दिसली. युरोपचे सान्निध्य त्याच्या ध्यानात आले. दोन तासातच त्याला इंग्लंडचा किनारा दिसू लागला. दक्षिण किनाऱ्याचा भाग त्याने ओलांडला. प्लेमाऊथ त्याने ओलांडले. अमेरिकन शेतीपेक्षा ब्रिटिश शेती त्याला अधिक आकर्षक वाटली. तिची वाटणी, तिची काटेकोर व्यवस्था, तिची समृद्धता – त्याच्या नजरेत भरणाऱ्या या गोष्टी होत्या. शेतीचे लहान लहान आकार त्याला विशेष विलोभनीय वाटले. त्यांच्या ताली, कुंपणे पाहून त्याची करमणूक झाली. सुमारे पंधराशे फूट उंचीवरून त्याचा प्रवास होत होता. ब्रिटिश खाडी, फ्रान्समधील शेरबर्ग इत्यादी खुणा त्याच्या मनास पटल्या. शेकडो मैलांची रम्य भूमी त्याच्या दृष्टिपथात येत होती. आता अंतिम साध्य अगदी हाताशी होते.

आकाशातून एवढे भ्रमण करणारा मानवी इतिहासातील लिंडबर्गच पहिला होता. ध्येय हस्तगत होत राहिल्याने तो खुषीत होता. पश्चिमेस सूर्य मावळण्याच्या बेतात असल्याने त्याचे सौम्य किरण मोठे सुखद वाटत होते. रात्रीच्या वेळेस पॅरिसचे झगमगते दिवे दिसताच, त्याच्या आनंदास उधाण आले. पॅरिसच्या वेळेप्रमाणे रात्रीचे दहा वाजले असून, युरोपची ही नखरेल नगरी – विलासाची क्रीडा करण्यास उत्सुक बनली होती. थोड्याच अवधीत चारशे फुटांच्या उंचीवरून लिंडबर्गचे विमान पॅरिसच्या 'एफेल टॉवर'ला फेऱ्या घालीत राहिले. त्याचे विमान मग विमानतळाकडे झुकले. अशा रात्रीही मोटारींच्या रांगा फार

मोठ्या प्रमाणावर त्याला तेथे दिसल्या. थोड्याच अवधीत पॅरिसच्या भूमीवर स्पिरिट ऑफ सेंट लुई उतरले. त्याच्या विमानाभोवती हजारो लोकांनी गराडा घातला. त्याचा जयजयकार लोकांनी केला. एक मोठा अद्‌भुत पराक्रम करून, अमेरिकेचा हा वीरपुत्र फ्रान्सला आला होता. फ्रान्स व अमेरिका यांची मैत्री आणखीन दृढ झाली. लोकांच्या प्रेमाला सीमा नव्हती. गर्दी, घाई, गोंधळ, हर्षाचे उद्‌गार, लिंडबर्गचे अभिनंदन याने सर्व वातावरण भारावून गेले. गर्दी हटवूनही कमी होईना. तो दमला असेल, त्याला विश्रांती हवी असेल असे कुणासच पटेना. धडधडत्या विमानाचा व त्याच्या फिरत्या चक्राचा त्रास कुणास न व्हावा, म्हणून त्याने विमानाचे इंजिन बंद केले. लोक विमानासही हात लावून पाहात होते. त्यांना ते सजीव वाटत असावे. नाही तर निर्जीव यंत्र अटलांटिक समुद्र कसा ओलांडणार? इतर काहींनी विमानास वेढा देऊन त्याच्या संरक्षणाची काळजी घेतली. तरी काही भागांची मोडतोड झालीच.

शेवटी लिंडबर्ग विमानातून बाहेर आला. म्हणजे तरी विमानाभोवती गर्दी कमी होईल अशी त्याची अपेक्षा होती; पण लोक त्याला व त्याच्या विमानास कवटाळण्यास तत्पर होते. एकच आरडाओरडा प्रेमाचा चालला होता. कुणाचाच शब्द कुणाला कळत नव्हता. लिंडबर्ग विमानातून बाहेर येतो न येतो, तोच त्याला लोकांनी डोक्यावर घेतले. खरे म्हणजे त्याला स्वतःला प्रयत्न करून बाहेर येण्याचे कारणच नव्हते ! तो प्रयत्न करण्याच्या आधीच लोकांनी त्याला ओढले व खांद्यावर घेऊन ते नाचू लागले ! आधीच फ्रान्सचे लोक हौशी. साहसाचे कौतुक त्यांनीच करावे. अर्धा तासपर्यंत मुळी त्याचे पाय जमिनीस लागलेच नाहीत. प्रत्येकाच्या मनात कौतुक ओसंडून जात होते; पण लिंडबर्गला त्रास होतो याची जाणीव कुणासच नव्हती.

शेवटी फ्रान्सच्या लष्कराने सर्व व्यवस्था स्वतःकडे घेतली. त्यांच्यापैकी एकाने लिंडबर्गची ओळख औपचारिक रीतीने वृत्तपत्रकारांना करून दिली. मग सर्व उपचार ठरल्याप्रमाणे झाले. फ्रान्सचे सरकार व पॅरिसचे नागरिक यांनी लिंडबर्गच्या स्वागताचा उत्सवसमारंभ मोठ्या थाटाने साजरा केला.

आणि इकडे अमेरिकेत सर्व लोक उत्सुकतेने, साशंकतेने लिंडबर्गचे वर्तमान ऐकण्यास अधीर बनले होते. वृत्तपत्राकडे सारखे फोन येत. दर नव्या आवृत्तीवर

लोकांच्या उड्या पडत. रेडिओवर सारखा पहारा असे. लिंडबर्गच्या सुयशासाठी अनेकांनी प्रार्थना केल्या. आयर्लंड, ब्रिटिश खाडी ओलांडून लिंडबर्ग निघाला तेव्हा साऱ्या राष्ट्रात कौतुकाची लाट उसळली; आणि आपला हा वीर पुरुष पॅरिसच्या विमानतळावर उतरल्याचे समजताच सारी अमेरिका हर्षातिरेकाने नाचत राहिली !

एक खास बोट पाठवून अमेरिकन सरकारने ह्या यशवान सुपुत्रास अमेरिकेत आणले. त्याचा अनेक रीतींनी सन्मान केला. मोठ्या शहरांतून त्याचा सत्कार झाला. अमेरिकन राजदूत ड्रॉइट मॉरो यांच्या सल्ल्यावरून तो मेक्सिकोतही गेला. तेथील १,५०,००० लोकांनी त्याची मुक्तकंठाने स्तुती केली. याच दूताच्या मुलीशी, — ॲनीशी — विवाह करून यशावर आणखी एक शिरपेच चढविला !

वॉशिंग्टनच्या स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूटमध्ये लिंडबर्गचे 'स्पिरिट ऑफ् सेंट लुई' आज स्तब्धपणे टांगले गेले आहे. त्याच्याशी थोडे हितगुज करताच, ते आपला अद्‌भुत प्रवास सहस्र मुखांनी सांगेल. मोठ्या परिश्रमाने लिंडबर्गनेही 'दि स्पिरिट ऑफ सेंट लुई' या आपल्या आत्मवृत्तपर पुस्तकात आपल्या शौर्याची अमरकथा निवेदन केली आहे. सन १९५४मध्ये या चरित्रपुस्तकास पुल्झर पारितोषिक मिळाल्याने, त्याचे नाव ज्याच्या त्याच्या तोंडी झाले. प्रसिद्ध अशा 'वॉर्नर ब्रदर्स'ने याच विषयावर एक अप्रतिम चित्रपट काढला. चार्ल्स लिंडबर्ग व त्याचे 'स्पिरिट ऑफ सेंट लुई' विमान-विद्येच्या इतिहासात अमर राहील.

BVBK-0403024

न. म. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. 3028
विषय क्रा. वा. दिनांक 9/7/2/08

# भारतीय शास्त्रज्ञ

लेखक : रमेश मुधोळकर

स्वतंत्र भारताची वैज्ञानिक वाटचाल ही आशादायी आहे. परंतु हे काही एकदम घडले नाही. त्यासाठी अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी आपले रक्त व घाम गाळले आहेत. कित्येक जणांनी विज्ञान मंदिराच्या पायाचे दगड होण्याचेही पत्करले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असतानाही ज्यांनी अत्यंत चिकाटीने, निष्ठेने आपले संशोधन चालू ठेवले, त्या थोर भारतीय वैज्ञानिकांनीच आधुनिक विज्ञानोपासक भारताचा पाया घातला. त्यांची चरित्रे ही नवीन पिढीला स्फूर्तिदायक ठरतील. अशा काही थोर भारतीय वैज्ञानिकांची चरित्रे या पुस्तकात समाविष्ट आहेत.

पृष्ठे : ५६

मूल्य : २० रुपये

**श्रीराम बुक एजन्सी**

७२७ डी, सदाशिव पेठ, बॅरि. गाडगीळ स्ट्रीट,

पुणे ४११ ०३०.

## आमची विज्ञानविषयक पुस्तके !

| | | |
|---|---|---|
| सहस्त्र सूर्यांचा प्रकाश | डॉ. प्र. न. जोशी | ४० रु. |
| भारतीय शास्त्रज्ञ | रमेश मुधोळकर | २० रु. |
| विज्ञानाच्या उद्यानात भाग १ ते ४ | डॉ. प्र. न. जोशी | ८० रु. |
| मनोरंजक विज्ञान भाग १ व २ | डॉ. प्र. न. जोशी | ५० रु. |
| वैज्ञानिक साहस कथा भाग १ व २ | निरंजन घाटे | ४० रु. |
| प्राण्यांचे जग | निरंजन घाटे | ४० रु. |